



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. ३१ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २४१ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## पारा उतरला... पावसाच्या सरीही पडल्या...



सोलापूर : सोलापूर शहराच्या तापमानात मंगळवारी बरीच घट झाली. पारा ४०.७ अंश सेल्सिअस इतका होता. सोमवारी हेच तापमान ४२.२ इतके होते. पारा उतरला असला तरी दिवसभर उन्हाचे चटके सहन करावे लागले. सायंकाळी मात्र, दिलासा मिळाला. ढगाळ हवामान निर्माण होऊन शहराच्या अनेक भागात पावसाच्या सरी पडल्या. अधून मधून वाराही सुटत होता. सायंकाळच्या ढगाळ वातावरणाने सोलापूरकरांना थोडा दिलासा मिळाला.

# शेतकरी वाऱ्यावर, बेकार युवक रस्त्यावर, महागाई निखाऱ्यावर, देवेंद्रजी शिवतीर्थावर

## ● फडणवीस-राज भेटीवर राष्ट्रवादीच्या पोस्टरबाजीने नवा वाद उफाळणार

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी रात्री उशिरा मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी अचानक भेट दिली. त्यावेळी फडणवीस आणि राज यांच्यात सुमारे दीड तास गुफ्तगू झाल्याची चर्चा आहे. ही वार्ता वाऱ्यासारखी पसरताच महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या भुवया उंचावल्या. या भेटीचे मंगळवारी राज्यभर पडसाद उमटले. मिडियाच्या प्रतिनिधींनी लागलीच फडणवीस यांच्याकडे धाव घेत या भेटीचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न केला पण फडणवीसांनी काहीच अंत लागू दिला नाही. केवळ गप्पा मारायला गेलो होतो, असे सांगून फडणवीस यांनी बंद खोलीत झालेल्या चर्चेची माहिती गुलदस्त्यातच ठेवल्याचे सांगण्यात येते. या भेटीवर राष्ट्रवादी काँग्रेसने पोस्टरबाजी करत भाजपावर टीकेचे घाव घातल्याने राजकीय संघर्ष चिघळण्याची चिन्हे दिसत आहे.

गेल्या काही महिन्यांपासून शिंदे गटासह भाजपामधील नेत्यांनी राज यांची भेट घेतल्याने मनसे आणि शिंदे-भाजपा यांची युती होणार असल्याची चर्चा रंगली आहे. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज यांना भेटले. त्यानंतर फडणवीस यांनीही शिवतीर्थावर हजेरी लावल्याने राज यांचे महत्त्व वाढले आहे. फडणवीस हे दोन वेळा राज यांना भेटले. यावरून वेगवेगळ्या राजकीय चर्चा सुरू असतानाच सोमवारी रात्री पुन्हा एकदा फडणवीस हे राज यांच्या मुंबईत निवासस्थान असलेल्या शिवतीर्थावर गेले होते. दोघांमध्ये प्रदीर्घ चर्चा झाली. या भेटीनंतर राजकीय वर्तुळातील अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राज यांच्याकडे एकही खासदार-आमदार नाही तेव्हा त्यांना इतके महत्त्व देण्याची काहीच गरज नाही, असा सूर आळवला गेला परंतु शिंदे यांच्यासह फडणवीस हे सातत्याने त्यांची भेट घेत असल्याने भारतीय जनता पार्टी उद्धव ठाकरेंच्या जागी पर्याय शोधत असल्याचे बोलले जात आहे. अनेक राजकीय विश्लेषकांना वाटते की, राज्याच्या राजकारणात भाजपासाठी राज हे उद्धव ठाकरेंची जागा भरून काढू शकतात. फडणवीस आणि राज यांच्यात बंद दाराआड काय चर्चा झाली हे कळू शकले नसले तरी यावर विरोधकांकडून मात्र प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. या भेटीबाबत शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले, फडणवीस यांनी शिवतीर्थावर लॉजिंग बोर्डिंग केले तरी आम्हाला काही अडचण नाही. फडणवीस तिथे गेले आणि हवे तर आठ दिवस राहिले तरी अडचण नाही. ते तिथे गेले कारण राज हे उत्तम होस्ट आहेत. ते लोकांचे आगत-स्वागत फार चांगले करतात. फडणवीसांप्रमाणे इतरांनीही तिथे जावे, राहावे. मुळात कोण कुणाकडे जातेय याच्यामुळे शिवसेनेचे भविष्य मार्गी लागत नाही. शिवसेना ही शिवसेनेच्या जागेवर आहे.



### काय आहे पोस्टरबाजी ?

या भेटीवर आता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून प्रतिक्रिया येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने या भेटीविरोधात पोस्टरबाजी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश ओबीसी सेलचे कार्याध्यक्ष राज राजापूरकर यांनी मुंबईत पोस्टर लावले आहेत. यावर लिहिले आहे की, हवालदिल शेतकरी वाऱ्यावर, बेरोजगार युवा रस्त्यावर, महाराष्ट्र महागाईच्या धगधगत्या निखाऱ्यावर, आणि राज्याचे उपमुख्यमंत्री मात्र टाईमपास गप्पा मारायला शिवतीर्थावर. ही पोस्टरबाजी भाजपाच्या वर्मी घाव घालणारी आहे.

### तर स्वागतच आहे

फडणवीस-राज यांच्या भेटीवर शिंदे गटाकडून सावध प्रतिक्रिया आली आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार शंभूराज देसाई यांनी 'महायुतीला मदत करायची असेल, तर स्वागतच आहे,' असे म्हटले आहे. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. जर हिंदुत्वाच्या मुद्द्यावर भाजपा आणि शिवसेनेबरोबर नवीन मित्र आलेच, तर चांगलेच आहे. भाजपा, शिवसेना आणि महायुतीला मदत करायची तर स्वागतच आहे, असेही देसाई म्हणाले.

### शिंदे गटाला शह...

लोकसभेच्या जागा वाटपावरून भाजपा व शिंदे गटात सध्या ताणाताणी सुरू झाली आहे. शिंदे गटातील काही आमदार पुन्हा 'मातोश्री'वर जाणार असल्याची चर्चाही सुरू झाली आहे.या पार्श्वभूमिवर फडणवीस यांनी अचानक राज यांची भेट घेवून आमच्यापुढे पर्याय असल्याचा संदेश शिंदे गटाला दिल्याची चर्चाही सुरू झाली आहे.

## मुळेगाव येथे अंगावर भिंत पडल्याने बांधकाम मजूर ठार

सुराज्य/सोलापूर

बांधकामावर सेंट्रींगचे काम करताना अचानक भिंत पडल्याने ३५ वर्षीय मजूर गंभीर जखमी होऊन मरण पावला. ही दुर्घटना मुळेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील दामले वस्तीत मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली.

हसन बाबू शेख (वय ३५ रा.वळसंग ता. दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. ते आज सकाळी १० वाजेच्या सुमारास दामले वस्ती येथील गायकवाड यांच्या घराचे बांधकाम करीत होते. पहिल्या मजल्यावर सेंट्रिंगचे काम करीत होते. त्यावेळी अचानक वरची भिंत ढासळून अंगावर पडल्याने ते गंभीर जखमी झाले होते.त्यांना सोलापुरातील खाजगी रुग्णालयात हुसेन (भाऊ) यांनी दाखल केले होते. उपचारादरम्यान ते दुपारी मरण पावले. मयत हसन शेख यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा आणि आई असा परिवार आहे.

## २० हजारांची लाच घेताना करमाळ्याची महिला मंडल अधिकारी अँटीकरप्शनच्या जाळ्यात

सुराज्य/सोलापूर

वारस हक्काच्या अर्जावर तक्रारदार यांच्या बाजूने निकाल देण्यासाठी २० हजाराची लाच घेताना करमाळा तहसील कार्यालयातील महिला मंडल अधिकारी शाहिदा युनूस काझी (वय ४२ रा.करमाळा) हिला अँटीकरप्शनच्या पथकाने रंगेहात पकडून गुन्हा दाखल केला. ही कारवाई उमरड (ता.करमाळा) येथील मंडल अधिकाऱ्याच्या कार्यालयात मंगळवारी दुपारच्या सुमारास करण्यात आली.

जेऊर परिसरातील एका तक्रारदाराने वारस नोंद साठी उमरड येथील मंडल अधिकाऱ्याकडे हरकतीचा अर्ज सादर केला होता. त्या अर्जाची सुनावणी करून तक्रारदाराच्या बाजूने निकाल देण्यासाठी शाहिदा काझी हिने २५ हजाराची लाच मागितली होती. तडजोडीनंतर २० हजार



रुपये देण्याचे ठरले होते.

दरम्यान तक्रारदाराने सोलापुरातील अँटीकरप्शन कार्यालयाशी संपर्क साधून तक्रार नोंदवली होती. त्याप्रमाणे पोलिसांनी आज दुपारी उमरड येथील कार्यालयात सापळा रचला होता. तक्रारदाराकडून लाचेची रक्कम घेत असताना पोलिसांनी काझी हिला ताब्यात घेऊन करमाळा पोलिसात गुन्हा दाखल केला. ही कारवाई अँटीकरप्शनचे पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस अंमलदार स्वामीराव जाधव, अतुल घाडगे, सलीम मुल्ला, शाम सुरवसे आदींनी पार पडली.



## जिल्ह्याधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन

### नरोटे, प्रा.निंबर्गी, सुरेश पाटील एकत्र

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहरातील पूना नाका ते हैद्राबाद नाका रोड वरील धोत्रीकर वस्ती येथे भुयारी मार्ग नसल्यामुळे अपघात होऊन एका व्यक्तीचा बळी गेला. आत्तापर्यंत जवळपास सहा बळी गेले आहेत. सततच्या अपघातामुळे संतप्त होऊन मंगळवारी तेथील नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात भुयार मार्ग करण्यात यावा या मागणीसाठी ठिय्या आंदोलन केले.

विशेष म्हणजे या आंदोलनात काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, भाजपाचे माजी नगरसेवक सुरेश पाटील, संजय कणके, प्रा. अशोक निंबर्गी एकत्र आले होते. नागरिकांना रस्त्याच्या पलीकडे जाण्यासाठी हायवेवरून जावे लागते भरधाव जाणाऱ्या मोठ्या वाहनामुळे या भागात सतत अपघात होत आहेत, नागरिक जीव मुठीत घेऊन जगत आहेत. या सततच्या अपघातामुळे संतप्त होऊन सुरेश पाटील, काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, काँग्रेसचे प्रवक्ते अशोक निंबर्गी, संजय कणके यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे ठिय्या आंदोलन केले. तेथून सात रस्ता येथील नवीन नियोजन भवन येथे जाऊन ताबडतोब भुयार मार्ग करण्यात यावे या मागणीचे निवेदन निवासी अप्पर जिल्हाधिकारी पवार यांना देण्यात आले. पवार यांनी संबंधितांची बैठक घेऊन मार्ग काढणार असल्याचे सांगितले.

## सांगवीत अपघातामधील जखमी वृध्दाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

सांगवी काटी (ता.तुळजापूर) येथील बस स्टॉप जवळ दुचाकीच्या धडकेने जखमी झालेले मारुती केरबा कदम (वय ८५ रा. पानधरवाडी ता.तुळजापूर) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना सोमवारी सायंकाळी मरण पावले. २४ मे रोजी सकाळच्या सुमारास तुळजापूर येथे जाण्यासाठी बसस्टॉप जवळ बसले होते.त्यावेळी एमएच१३-बीएम- ९५१३ या क्रमांकाची दुचाकी धडकल्याने गंभीर जखमी झाले होते. त्यांना तुळजापूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले होते. अशी नोंद सिव्हिल चौकी पोलिसात झाली आहे.

## बस धडक दिल्याने गंभीर जखमी झालेल्या पादचाऱ्याचा झाला मृत्यू

सुराज्य/सोलापूर

बाह्यवळण रस्त्यावर धोत्रीकर वस्ती येथे रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्याला कर्नाटक-मुंबई आरामबसने धडक दिल्याने गंभीर जखमी झालेल्या अंबादास क्षीरसागर (वय-५०, धोत्रीकर वस्ती) यांचा उपचारादरम्यान मंगळवारी सकाळी आठच्या सुमारास मृत्यू झाला.

सोमवारी रात्री पावणेअकराच्या सुमारास शेळगीजवळील रघोजी ट्रान्सपोर्टजवळील हायवेवर हा अपघात घडला होता.सोमवारी सायंकाळी सहाच्या सुमारास कर्नाटकातील शहापूर येथून एमआर ट्रॅव्हल्सची खासगी बस मुंबईकडे निघाली होती.ही बस मार्केट यार्डासमोरून शेळगी जवळील धोत्रीकर वस्ती येथून सुसाट धावत होती.त्या दरम्यान, क्षीरसागर हे रस्ता ओलांडत होते.त्यावेळी आरामबसची धडक बसल्याने ते रस्त्यावर कोसळले. त्यांच्या डोक्यातून रक्त वाहिले.हाताला खरचटून जखमी झाले.या भागातील रहिवाशांची अनेक दिवसांपासून पुलाची मागणी आहे.ती पूर्ण होत नसल्याने नागरिक चांगले संतापले होते.महिला तसेच नागरिकांनी महामार्गावर ठिय्या आंदोलन करत काही काळ वाहतूक रोखून धरली.दरम्यान जखमी क्षीरसागर यांना मित्र लक्ष्मण भास्कर याने शासकिय रुग्णालयात दाखल केले.मंगळवारी सकाळी आठ वाजता उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.




### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता पोटा-पाण्याचं बघा!

कल्याण
889-58-459

मेन बाजार
---------

# एक विद्यार्थी, एक पुस्तक वापरणार, एक वर्षभर

सुराज्य/सोलापूर

चालू वर्षापासून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी व्हावे या हेतूने शिक्षण बोर्डाने विद्यार्थ्यांना 'पुस्तक एक विद्यार्थी एक', 'पुस्तक वापरणार एक वर्ष' अशा प्रकारची नव्याने मोहीम सुरू केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

पूर्वी प्रत्येक विद्यार्थ्याला वेगवेगळे पुस्तक आणि वेगवेगळ्या विषयाच्या वह्या घ्यावे लागत असे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठे ओझे सहन करावे लागत होते. आठ पुस्तके आठ वह्या आणि इतर आठ अशा जवळपास २० ते २५ वह्या पुस्तकांचे ओझे विद्यार्थ्यांच्या पाठींवर पिशवीत भरलेले असायचे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेला जाताना त्रास होत होता. त्यात सध्या शिक्षण विभागाने सुधारणा करून वरील प्रमाणे शिक्षण निर्णय घेतला असल्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय जाहीर यांनी सांगितले. सध्या जिल्ह्यात पहिली ते पाचवीपर्यंत दोन लाख ६८ हजार ३७ विद्यार्थी विद्यार्थी- विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत तर सहावी ते आठवी या वर्गात एक लाख ६७ हजार २९९ अशी विद्यार्थ्यांची संख्या आहे. त्याकरिता जवळपास १४ ते १५ लाख प्रति पुस्तकाप्रमाणे विद्यार्थ्यांना पुस्तके लागणार असून आजपर्यंत जिल्ह्यातील विविध शाळेतील विद्यार्थ्यांकरिता जवळपास सात ते आठ लाख पुस्तके उपलब्ध झाली असल्याचे सांगण्यात आले.

उर्वरित पुस्तके येत्या दोन-चार दिवसात येणार असल्याचेही यावेळी सांगितले तसेच १५ जून रोजी शाळेचा पहिला दिवस त्यामुळे शाळेच्या पहिल्या दिवशी ही सर्व पुस्तके विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येतील. त्यामुळे विद्यार्थी या पुस्तकापासून वंचित राहणार नाही याची पुरेपूर खबरदारी शिक्षण विभागाने घेतली घेतली आहे. त्यामुळे दरवर्षी जो त्रास होत होता. तो या वर्षापासून होणार नसल्याचे सांगण्यात आले. तसेच भाग एक या पुस्तकांमध्ये प्रथमदर्शनी पहिल्या पानावर पहिला धडा असेल त्या धड्याच्या संदर्भातील माहिती लिहिण्यासाठी किंवा इतर प्रश्न उत्तर सोडविण्यासाठी त्याच्याच बाजूला वही सारखा कोरीव कागद याच पुस्तकात जोडलेला आहे. त्यामुळे वेगळी स्वतंत्र वही वापरण्याची गरज भासणार नाही. अभ्यास करणे आणि त्याबाबतचे लिखाण करणे हे एकाच पुस्तकात राहणार असल्यामुळे विद्यार्थ्यांना इतर ठिकाणाचे लिहिण्याची किंवा वही खरेदीची गरज भासणार नाही अशा प्रकारचा यंदाच्या वर्षी शिक्षण विभागाकडून नव्याने करण्यात आलेला हा एक आगळावेगळा उपक्रम आहे. मात्र या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थी आनंदित झाले असल्याचे प्रत्यक्ष दर्शनी दिसून येत आहे हे विशेष.



### सध्या विद्यार्थ्यांना मिळणारी पुस्तके अशी असणार

प्रत्येकी विद्यार्थी भाग पहिला एक एक पुस्तक भाग दुसरा एक पुस्तक भाग तिसरा एक पुस्तक आणि भाग चौथा एक पुस्तक असे वर्षभरामध्ये एकूण एक पुस्तक चार भाग असे जरी असले तरी चार भागात चार पुस्तके वापरताना मात्र एका भागासाठी एकच पुस्तक वापरावे लागणार आहे. त्यापैकी एका भागात एक असे शेवटपर्यंत एकच पुस्तकाचा वापर विद्यार्थी करणार आहेत तसेच पहिल्या भागाचे पुस्तक बाद झाल्यानंतर दुसऱ्या भागाचे पुस्तक दिले जाते ते वापरून बाद झाल्यानंतर तिसऱ्या भागाचे पुस्तक दिले जाते अशा प्रकारे वर्षभरामध्ये एकूण चार भागांची पुस्तके असणार असून विद्यार्थ्यांना वर्षभरामध्ये प्रत्येकी एक एकच पुस्तक हातामध्ये घेऊन ये जा करावी लागणार आहे.

# संघर्षशील नेता

संसदेत महाराष्ट्रातून काँग्रेसचे एकमेव खासदार असणारे बाळू धानोरकर यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या जाण्याचा दुःखावेग केवळ चंद्रपूर जिल्ह्यालाच नव्हेतर अख्ख्या महाराष्ट्रातील तमाम मराठी माणसाला सहन न होणारा आहे. अगदी लहान वयात मृत्यू यावा आणि वडील गेल्यानंतर दोन-चार दिवसातच देवाकडून बोलावणे याचे, असे दुःख कोणाला सहन होईल. एक धडाडीचे युवा नेते म्हणून चंद्रपूर जिल्ह्यात ओळखले ते जात होते. संघर्षशील आणि लढाऊ वृत्ती ही त्यांची गुण वैशिष्ट्य. त्यामुळे त्यांच्या राजकीय वाटचालीत अनेक अडचणी आल्या. त्यांचा खरा पिंड एक कट्टर शिवसैनिक म्हणून होता पण घुसमट सहन न झाल्याने अखेर त्यांनी काँग्रेसची वाट धरली. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत तत्कालीन केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांचा पराभव करून विजय मिळवल्यानंतर ते राज्यात फेमस झाले. काँग्रेसचा एकमेव खासदार अशी त्यांची ओळख दिल्ली दरबारी झाली. कट्टर शिवसैनिक ते काँग्रेस असा परस्परविरोधी विचारांचा प्रवास करीत अतिशय अल्पकाळात राजकारणात त्यांनी स्वसामर्थ्य प्राप्त केले होते. त्यांच्या अकाली निधनाने एक संघर्षशील नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे. विशेष म्हणजे गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने आधी उमेदवारी नाकारली होती, पण नंतर बदल झाला. उमेदवारी मिळाली आणि धानोरकर हे राज्यातून एकमेव काँग्रेसचे खासदार निवडून आले होते. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेस औषधालाही शिल्लक राहणार नाही, असे वाटत असतानाच



धानोरकर यांनी अनपेक्षित विजय मिळवून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला होता. त्यांचा १७ वर्षाचा राजकीय तसा खडतरच. पण संघर्ष करून त्यांनी त्यावर मात केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात २०२४ मध्ये वाराणसी लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढण्याची घोषणा करून धानोरकर चर्चेत आले होते. प्रशासकीय वर्तुळात त्यांचा दबदबा होता. भाजपच्या विरोधात ते अतिशय आक्रमकपणे रस्त्यावर येत. लोकसभेतही विविध चर्चेत त्यांचा सहभाग असायचा. मतदारसंघाचे प्रश्न, विदर्भाचे मुद्दे त्यांनी लावून धरलेत. विविध पक्षात त्यांची मैत्री कायम होती. राजकीय जीवनाची सुरुवात त्यांनी २००६ मध्ये शिवसेना चंद्रपूर जिल्हा प्रमुख म्हणून सुरू केली. २००९ मध्ये त्यांनी सर्वप्रथम वरोरा-भद्रावती विधानसभा निवडणूक लढविली. पण पराभूत झाले. त्यानंतरही पाच वर्षांत संपूर्ण मतदार संघ पिंजून २०१४ ची निवडणूक काँग्रेस नेते संजय देवतळे यांच्या पराभव करून जिंकली. नगरपालिका निवडणुकीवरून सेनेतील वरिष्ठांशी मतभेदांमुळे त्यांनी २०१९ मध्ये शिवसेनेना सोडली व काँग्रेस प्रवेश केला. चंद्रपूर-वणी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारीसाठीही त्यांना संघर्ष करावा लागला. काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी त्यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. विनायक बांगडे यांची उमेदवारी जाहीर झाली होती. पण धानोरकर यांची निवडून येण्याची क्षमता लक्षात घेऊन शेवटच्या क्षणी काँग्रेसने उमेदवार बदलून धानोरकर यांना रिंगणात उतरविले. त्यांच्या पुढे भाजपचे हंसराज अहिर यांच्यासारखे प्रबळ उमेदवार होते. या मतदारसंघात मोठ्या संख्येने धनोजे कुणबी समाज आहे. धानोरकर हे याच समाजाचे प्रतिनिधित्व करीत होते. त्यांच्या रूपात प्रथमच समाजाला निवडणुकीत प्रतिनिधित्व मिळाले. राज्यातून काँग्रेसला मिळालेली ही एकमेव जागा होय. त्यानंतर त्यांनी मागे वळून बघितले नाही. २०१९ मध्ये त्यांनी त्यांच्या पारंपरिक वरोरा-भद्रावती मतदार संघातून पत्नी प्रतिभा धानोरकर यांनाही आमदार म्हणून निवडून आणले. भद्रावती नगर परिषदेत धानोरकर यांची सलग १५ वर्षांपासून एकहाती सत्ता आहे. यावरून त्यांच्या जिल्ह्यातील राजकीय शक्तीचा अंदाज येतो. १६ मे रोजी त्यांनी चंद्रपुरातील नवीन बंगल्याचे वास्तुपूजन केले होते. विशेष म्हणजे मागील काही दिवसांपासून स्थानिक पातळीवर काँग्रेस नेत्यांशी राजकीय मतभेद सुरू होते. धानोरकर हे सुरुवातीपासूनच राजकारणात कोणताही धोका पत्करण्याची तयार ठेवणारे नेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे भद्रावती नगरपालिकेपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास संसदेपर्यंत येऊन पोहोचला. काँग्रेस पक्ष आता चंद्रपूरची पोकळी कशी भरून काढणार हा खरा प्रश्न आहे.

जयंतीनिमित्त

# स्त्री व्यक्तीमत्वाचा ठसा उमटवणाऱ्या तत्वज्ञानी : महाराणी अहिल्याबाई

'ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो' असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता अहिल्यादेवी होळकर. सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांविषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरीती रूढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील 'चौंडी' या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला.

माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील असून देखील ते विद्वान व दूरदर्शी गृहस्थ होते. अठराव्या शतकामध्ये आजच्यासारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील त्यांनी अहिल्येला शिक्षणाची घरीच व्यवस्था केली. अहिल्या मातेचे जीवन घडविण्यात त्यांचा फार मोलाचा वाटा होता. अवघ्या आठ वर्षाची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा बारा वर्षाचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्याचा विवाह २० मे १७३३ रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला.

लग्नानंतर लगेच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या.तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्येची सामाजिक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली.

इ. स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याचा शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले.



वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहिल्याबाईंनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून अहिल्याबाईने प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रूढी, परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्त्वाचे माणून रयतेला कल्याणकारी राज्य दिले.

मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर २९ वर्षे अत्यंत यशस्वीपणे खऱ्या कल्याणकारी योजना काय असू शकतात आणि त्या कशा राबवल्या जाव्यात हे त्यांनी दाखवून दिले. सासरा मल्हाररावांचा मृत्यू २० मे १७६६, मुलगा मालेरावांचा मृत्यू २७ मार्च १७६७ मध्ये झाला. अशी एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतः च्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्त्वाप्रमाणे राज्य केले.

पेशवा रघुनाथराव याला होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला. त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदौरवर चढाई केली. हे वृत्त तेजस्विनी अहिल्याबाईला कळताच खचून न जाता त्यांनी रघुनाथरावांना खलिता पाठविला त्या म्हणतात, आपण माझे राज्य हिरावून घेण्याचे कपट रचून आलात आमच्याकडील फितूरास गाठले. मला दुबळी समजलात की खुळी? दुःखात बुडालेल्यास आधिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू? आता आपली गाठ रणांगणात पडेल. माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल मी हरले तर कीर्ती करून जाईल.

पण आपण हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजू नका. मी खांद्यावर भाले घेऊन समोर उभे राहिले तर पेशव्यांना भारी पडेल. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीशी बांधून तुमचे स्वागत न केले तर होळकरांच्या सुनेचे नाव लावणार नाही. मुत्सद्दी अहिल्या म्हणजे तळपती समशेर आणि लखलखती वीज होती. त्यांनी आपल्या आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपूर्ण भारतात कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात अनेक विहिरी, तलाव, कुंड, घाट बांधले आहेत. रस्ते, पूल निर्माण केले आहेत. जे काम भारताच्या शासनव्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते ते काम लोकमाता अहिल्याबाईंनी केले. उद्योगधंद्यांना व त्याच्या विकासाला प्राधान्य दिले. मल्हाररावांच्या मृत्यूनंतर इंदौरवरून संस्थानाची राजधानी महेश्वर या ठिकाणी आणून कारागीर, मजूर, विणकर, कलावंत, साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या. आजही महेश्वरी साड्या, पैठणी, धोतर प्रसिद्ध आहेत. राज्यात पशुपक्षी यांना चरण्यासाठी त्यांनी कुरणे राखली.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, मशिदी, दर्गे व विहार बांधली. तर काही मंदिरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुरा सोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलींचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई ह्या समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवताधर्म. प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोककल्याणासाठी केला. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन!

**- शिवाजी हळणवार, पंढरपूर.**

टुडेज् ब्लॉग


# व्यसनमुक्त जीवनाचा संकल्प करा

आपल्या समाजात आणि देशात तंबाखूचे विष सतत पिढ्यानपिढ्या नष्ट करून त्यांना वेदनादायी मृत्यूच्या उंबरठ्यावर उभे करत आहे. आश्चर्य म्हणजे तंबाखूसारखे मादक घातक विष आपल्या आजूबाजूला अगदी सहज उपलब्ध आहे. लहान मुलांपासून तरूण, महिला, वडीलधारी मंडळी तंबाखूच्या व्यसनाच्या आहारी गेली आहेत. घर-ऑफिस असो, चौक, बाजार, कार्यालय, संस्था किंवा इतर कोणताही परिसर, अनेक लोक तोंडात तंबाखू दाबताना किंवा सिगरेट फुंकताना दिसतात. सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास बंदी असतानाही लोक नियम मोडतात.

सध्या शहरांमध्ये ई-सिगारेटचा ट्रेंड सुरू झाला असून, त्याकडे नवीन पिढी आकर्षित होत आहे. तंबाखूचे सेवन बीडी, सिगारेट, हुक्का, सिगार, चुटा, धुमटी, चिलम, चिरूट, गुटखा, खैनी, जर्दा, खर्रा, तंबाखू पान मसाला, तंबाखूची सुपारी, मावा, स्नूस, मिश्री, गुल, स्नफ व इतर स्वरुपात करण्यात येतो. तंबाखू जाळल्यावर त्या धुरातून निघणारी अनेक विषारी रसायने आणि संयुगे मानवी शरीरासाठी हानिकारक असतात. तंबाखूतील निकोटीन हे हेरॉइन, कोकेन आणि अल्कोहोलसारखे व्यसन आहे, ते काही सेकंदात मेंदूपर्यंत पोहोचते. धूम्रपान केल्याने फुफ्फुसांचे नुकसान होते, स्नायूंना ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो आणि तग धरण्याची क्षमता देखील कमी होते. निकोटीन व्यतिरिक्त, तंबाखूमध्ये अमोनिया, आर्सेनिक, कार्बन मोनोऑक्साइड, टार, नॅप्थालीन, किरणोत्सर्गी संयुगे, हायड्रोजन सायनाइड, शिसे, कॅडमियम, मेन्थॉल यासारखे विषारी घटक असतात. तंबाखू मानवी शरीराला जीवघेण्या आजारांकडे ढकलते.

जागतिक स्तरावर दरवर्षी ६,००,००० मृत्यू सेकंड हँड स्मोकमुळे होतात. सेकंड हँड स्मोक म्हणजे व्यक्ती स्वतः धूम्रपान करत नाही परंतु दुसऱ्याचा धूम्रपानद्वारे निर्मित धुराचा संपर्कात आल्याने जीवघेण्या आजारांनी ग्रासतात. जगातील जवळपास निम्मी मुले तंबाखूच्या धुरामुळे प्रदूषित हवेत श्वास घेतात.

तंबाखू वापरणाऱ्यांपैकी निम्म्याचा मृत्यू होतो. प्रत्येक सिगारेट ८ ते ११ मिनिटांनी आयुष्य कमी करते. तंबाखूमुळे दरवर्षी ८० लाखाहून अधिक लोकांचा मृत्यू होतो. त्यापैकी ७० लाखाहून अधिक मृत्यू थेट तंबाखूच्या वापरामुळे झाले आहेत तर सुमारे १२ लाख मृत्यू हे धुम्रपान न करणाऱ्यांचे सेकंडहँड धुरांच्या संपर्कात आल्याने होतात. जगातील १३० कोटी तंबाखू वापरकर्त्यांपैकी ८०% पेक्षा जास्त लोक कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये राहतात. २०२० मध्ये, जागतिक लोकसंख्येच्या २२.३७, पुरुषांपैकी ३६.७७ आणि महिलांपैकी ७.८% तंबाखूचा वापर करतात. तंबाखूमुळे भारतात दरवर्षी सुमारे १३.५ लाख लोकांचा मृत्यू होतो, म्हणजे दररोज सरासरी ३,६९९ मृत्यू, दर तासाला १५४. तंबाखूच्या हानिकारक परिणामांमुळे दर ५ पैकी १ पुरुषाचा मृत्यू होतो.



इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने जारी केलेल्या राष्ट्रीय कर्करोग नोंदणी कार्यक्रम अहवाल २०२० नुसार, देशातील सर्व कर्करोगाच्या २७७ प्रकरणांसाठी तंबाखू जबाबदार आहे. ग्लोबल अडल्ट टोबॅको सर्व्हे इंडिया २०१६-१७ नुसार, भारतात सुमारे २६.७ कोटी प्रौढ तंबाखू वापरकर्ते आहेत. २०१७-१८ मध्ये भारतात ३५ वर्षे व त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींना तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या सर्व आजारांमुळे एकूण आर्थिक खर्च रु. १,७७,३४१ कोटी होता. देशाच्या केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याणच्या नॅशनल फॅक्ट शीट ग्लोबल यूथ टोबॅको सर्व्हे (जीवाईटीएस-४) २०१९ नुसार, १३-१५ वयोगटातील सुमारे पाचवा भाग त्यांच्या आयुष्यात तंबाखूजन्य पदार्थ वापरतात. तंबाखू सेवनाचे प्रमाण मुलांमध्ये ९.६% आणि मुलींमध्ये ७.४% आहे. तंबाखूच्या धूम्रपानाचे प्रमाण ७.३% आहे. धूरविरहित तंबाखूजन्य उत्पादनांच्या बाबतीत, त्याचे प्रमाण ४.१% आहे. विद्यार्थ्यांमध्ये ई-सिगारेटचा वापर २.८% आहे. या राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये सध्याचा तंबाखू वापराची टक्केवारी अरुणाचल प्रदेश आणि मिझोराम (प्रत्येकी ५८%) ते हिमाचल प्रदेश (१.१%) आणि कर्नाटक (१.२%) आहे.

व्यसन फक्त नाश करते, मग ते कोणतेही असो. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीला गंभीर आजारांमुळे आपला जीव गमवावा तर लागतो, पण त्या धुराच्या संपर्कात आलेले कुटुंबीय किंवा तिथे श्वास घेणारे इतर लोकही जीवघेण्या आजारांच्या विळख्यात येतात. तंबाखू मानवी शरीराला आतून पूर्णपणे पोकळ बनवून कमकुवत करते, शरीर बिघडवून, वेदनादायक घातक रोगांनी अकाली वेदनादायक मृत्यूच्या तोंडात टाकते. यापैकी बहुतेक रोगांवर उपचार तंबाखूच्या व्यसनापासून मुक्त होण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जागरूकता, इच्छाशक्ती आणि समज. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम भारत सरकारद्वारे चालवला जातो. आज देशाचे उज्ज्वल भविष्य घडवणाऱ्या पिढीला तंबाखूच्या विषापासून वाचवायचे आहे. मुलांना नशेपासून दूर ठेवण्यासाठी पालक आणि शिक्षकांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. नशा करू नका आणि इतरांना व्यसनमुक्तीसाठी प्रेरित करा. आपले आणि आपल्या प्रियजनांचे जीवन आनंदी करण्यासाठी, व्यसनमुक्त जीवन जगण्याचा संकल्प करा.

**- डॉ. प्रितम गेडाम, नागपूर.**


जन्म हा अखेरचा

## इंद्रियानुग्रहस्थल - २

एका नगरात एक तपस्वी महात्मा गेला. तेथे त्याला कोणीही भिक्षा घातली नाही. उलट त्याचा पदोपदी अपमान करण्यात आला. तपस्व्याने सर्व नागरिकांना धडा शिकवण्याचे ठरविले. ज्या विहिरीतून सर्व नगराला पाणीपुरवठा होत असे, त्या विहिरीतले पाणी त्याने अभिमंत्रित केले. जो हे पाणी पिईल, त्याला वेड लागेल. झाले, दुसऱ्या दिवशी सगळे लोक ते पाणी प्याले आणि सर्व नागरिकांना वेड लागले. अंगावरचे कपडे फाडून सर्वजण दिगंबर झाले. राजाच्या नावाने ओरडत नागरिकांचा जत्था राजवाड्याकडे निघाला.

राजाने आणि प्रधानाने त्यांना येताना पाहिले. त्यांना आश्चर्य वाटते. राजवाड्यात वेगळी विहीर असल्यामुळे तेथील लोकांना वेड लागलेले नव्हते. आपल्या प्रजेची दिगंबर अवस्था पाहून राजाने चौकशी केली. तेव्हा राजाला खरा प्रकार समजला. सर्व प्रजा वेडी झाल्यामुळे आपण शहाणे राहून यांच्यावर राज्य करण्यात अर्थ नाही, हे त्याला उमगले. तो प्रधानाला म्हणाला, 'जा, माझ्यासाठी देखील त्या विहिरीतले पाणी घेऊन ये. सर्व प्रजा दिगंबर आणि पागल असताना मी अंगावर कपडे ठेवून आणि शहाणा राहून त्यांच्यावर राज्य करु शकत नाही. कारण हे बहुसंख्य आहेत आणि मी एकटा आहे. ज्या ठिकाणी सगळेच वेडे असतात तेथे एक शहाणा वेडा ठरतो. कारण बहुमताने ठराव करुन ते शहण्याला वेडा ठरवू शकतात.'

आपली अशीच स्थिती असते. शास्त्राच्या आदेशाचे नव्याण्णव टक्के लोक उल्लंघन करताना केवळ एकच मनुष्य शास्त्रादेश पाळत असतो. ज्यांची संख्या अधिक त्यांचेच आचरण बरोबर आहे असे मानले जाते. मनुष्यसमाज सुधारायचा असेल तर त्यांची पागलबुद्धी सुधारायला पाहिजे. शास्त्राचे शासन बुद्धीवर हवे आणि बुद्धीचे इंद्रियांवर. तेव्हाच आपले



जीवन सुधारु शकते. म्हणून आपली सर्व इंद्रिये, मन आणि प्राण भगवद्र्पण केले पाहिजे. इंद्रियांनी भगवंताची पूजा घडावी. मनाने भगवंताचे चिंतन व्हावे आणि श्वासोच्छ्वासासोबत भगवंताचे नामस्मरण करावे. जप किती करावा? कमीत कमी १०८ वेळा करावा, असे आम्ही सांगतो. नामस्मरण हा एक अभ्यास आहे. तो वाढत गेला पाहिजे. परंतु बरेच लोक १०८च्या पुढे जातच नाहीत. मरेपर्यंत १०८च जप करतात. एखादा बुद्धु मुलगा वर्षानुवर्षे पहिल्याच वर्गात राहतो, त्याची प्रगती होत नाही. तसेच हे आहे. काही महाभाग तर पहिल्या वर्गातून वर तर जात नाहीत...

**(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## तंबाखू सोडा...आरोग्याची कास धरा

तंबाखू हे एक वाईट व्यसन आहे. आज जगात अनेक ठिकाणी तंबाखू व त्यापासून बनविण्यात येणारे पदार्थ अनेक जण खातात व हळूहळू त्याच्या आहारी जातात. तंबाखूमध्ये निकोटीन नावाचे द्रव्य असते ते आरोग्याला मारक असते. एका अंदाजानुसार जगात दरवर्षी १० लाखावर लोक तंबाखू व त्याच्या पदार्थ खाण्यामुळे मृत्यू मुखी पडतात. तसेच धूम्रपान करतात. जगातील ३६ टक्के पुरुष व ५ टक्के महिला तंबाखू किंवा त्याचे पदार्थ खातात.

पूर्वी हे व्यसन स्त्रियांच्यात क्वचित दिसे. आज मात्र अगदी महाविद्यालयीन तरुणी सुद्धा धूम्रपान करताना दिसतात. तंबाखूपासून सिगरेट बनविल्या जातात. अखंड सिगारेट ओढणारे चेन स्मोकर आज अनेक ठिकाणी आपणास दिसतात. या व्यसनामुळे हृदय रोग, कर्करोग, टीबी, फुफ्फुस रोग, यकृताचे विकार, इत्यादी होतात. व्यंग असणारे बाळ सुद्धा हे व्यसन असणाऱ्या महिलेकडून जन्माला येण्याचा धोका असतो. आज अनेक शालेय मुलांना तंबाखूचे व्यसन लागलेले असते. अनेक जण मजेखातर सिगरेट ओढतात व व्यसनाच्या आहारी जातात. सिगरेट ओढणाऱ्यांमध्ये पुरुषांच्या बरोबर स्त्रियांही आहेत. सिगरेट ओढणाऱ्याच्या जवळ बसले की सिगरेटचा उग्र वास येतो. या तंबाखू व्यसनाला रोखण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न सुरु झाले. जागतिक आरोग्य संघटनेने ७ एप्रिल १९८८ ह्या दिवशी ठराव केला व ३१ मे १९८८ पासून हा दिवस जागतिक पातळीवर तंबाखू विरोधी दिन म्हणून साजरा करण्यास सुरवात झाली.

दरवर्षी एक घोषवाक्य या विरोधी दिनाच्या निमित्ताने तयार केले जाते. २०२३ साठी 'आम्हाला अन्न हवे...तंबाखू नको' हे वाक्य यासाठी निवडण्यात आले आहे. या दिनानिमित्त सार्वजनिक ठिकाणी जाहिरात मोहिमा व तंबाखूचे धोके लोकांना पटवून दिले जातात. विविध राज्य सरकारे व केंद्र सरकारच्या सहयोगामुळे अनेक कायदे केलेले आहेत. निरोगी व अनादी आयुष्य जगण्यासाठी व्यसन मुक्ती हवी. व्यसनामुळे आरोग्याची व पैशाची सुद्धा हानी होते. त्याचा त्रास कुटुंबियांना होतो. हे सर्व टाळून व तंबाखू व्यसन दूर करून आरोग्यमय व आनंदी जीवन जगूया हाच संदेश या दिवसाचा आहे. आपले आयुष्य हे ईश्वरी वरदान आहे. या आयुष्याचा उपयोग आपण आनंद व मजेत घालवावयास हवा. याशिवाय व्यसन सोडल्याने पैसेही वाचू शकतील. त्यासाठी आपणास कोणतेही व्यसन नको, असे केल्यास एक सुदृढ व आनंदी पिढी तयार होईल व ते एक राष्ट्राचे वैभव ठरेल यात शंका नाही.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# बारावीनंतर व्यवस्थापन क्षेत्रात करिअरची संधी

बारावीचा निकाल लागल्यानंतर उत्तीर्ण झालेल्या पाल्यांच्या घरामध्ये प्रचंड चर्चा चाललेली असते. ती चर्चा असते पाल्य व पालक यांच्यामधील बारावीनंतरच्या शिक्षणाच्या प्रवेशासंबधीची! यातून अनुभवायला मिळते ताणतणाव संदिग्धता. जे विद्यार्थी बारावी आर्ट्स, कॉमर्स व सायन्स तसेच व्होकेशनल परीक्षेत यश संपादन केले आहेत अशा विद्यार्थ्यांना व्यवस्थापन क्षेत्रात विविध करिअर उपलब्ध आहेत. त्याची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे -

१. बारावीच्या कोणत्याही फॅकल्टीमधून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी बीबीए अर्थात बॅचलर ऑफ बिझनेस ऍडमिनिस्ट्रेशन हा तीन वर्षाचा कोर्स पूर्ण करू शकतात. प्रत्येक क्षेत्रात आज उत्कृष्ट व्यवस्थापनाची गरज आहे. व्यवस्थापनातील सर्व कला, कौशल्याची माहिती विद्यार्थ्यांना या कोर्स द्वारे मिळते. २. बीबीए नंतर ते विद्यार्थी कोणत्याही कंपनीमध्ये आर्थिक नियोजन व व्यवस्थापनाचे काम करू शकतात; याशिवाय तो मानवी व्यवस्थापनाचे काम करू शकतो.

सध्याच्या या अशाश्वत युगामध्ये विमा व्यवसायामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. त्या क्षेत्रातही करिअरच्या खूप संधी उपलब्ध आहेत. याशिवाय बँकिंग म्हणजे आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे सरकारी आणि खाजगी क्षेत्रामध्ये विद्यार्थी काम करू शकतात. याशिवाय सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ते स्वतःचा एखादा व्यवसाय करू शकतात. हा कोर्स पूर्ण केल्यानंतर त्याला नोकरी मिळवण्यापेक्षा दुसऱ्यांना नोकरीची संधी देण्याचे सामर्थ्य व आत्मविश्वास निर्माण होतो. ३. बारावी कॉमर्स नंतरचा विद्यार्थी बी. कॉम अर्थात बॅचलर ऑफ कॉमर्स हा तीन वर्षाचा डिग्री कोर्स करू शकतो. त्यानंतर ते एमबीए व एमकॉम सारखे कोर्स करू शकतात. ४. बारावी कॉमर्स नंतर विद्यार्थी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) व कंपनी सेक्रेटरी म्हणजे (सीएस) असे कोर्सेस करून पांढरपेशा व्यवसायामध्ये उतरू शकतात. ५. सध्या मार्केटिंग म्हणजे विपणन क्षेत्रात विद्यार्थ्यांना भरपूर करिअरच्या संधी आहेत. सध्या संपूर्ण जग हे विपणन क्षेत्र झाले आहे.

सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. सामाजिक, आर्थिक, तांत्रिक व सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये होणारे बदल व त्याविषयीचा सततचा अभ्यास, वरील सर्व बदलांना सामोरे जाण्याचे आव्हान सर्वांसमोर आवासून असून उभे आहे. विद्यार्थ्यांनी फक्त शिक्षण घेऊन उपयोग नाही तर त्याच्यामध्ये काही जीवन कौशल्य विकसित होणे गरजेचे आहे. जसे विचारांची प्रगल्भता, नवीन काही करण्याचा ध्यास, निर्णय क्षमता, प्रश्न सोडवण्याचे कौशल्य, सर्व प्रश्नांना सामोरे जाण्याची ताकद हे सर्व जीवन कौशल्य यांनी स्वतः विकसित करणे गरजेचे आहे.



यासाठीच अकलूज व आजूबाजूच्या परिसरामधील विद्यार्थ्यांना व्यवस्थापन क्षेत्रातील पदवी घेण्याची सुवर्णसंधी अकलूज येथील शिवरत्न शिक्षण संस्थेने निर्माण केली आहे. आपल्याला शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन तीन वर्षाचा बॅचलर ऑफ बिझनेस ऍडमिनिस्ट्रेशन (बीबीए) हा कोर्स करता येतो. कॉलेज शैक्षणिक ज्ञानावर तर भर देतेच याशिवाय विद्यार्थ्यांच्यामधील उपजत कलागुणांना वाव देण्यासाठी संस्थेच्या संस्थापिका शितलदेवी मोहिते-पाटील या विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. याशिवाय विविध क्षेत्रातील तज्ज्ञ वेळोवेळी आमंत्रित केले जातात, औद्योगिक भेटींचे नियोजन व विविध सामाजिक कार्याचे आयोजन यामधून विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यवस्थापन क्षेत्रातील कला कौशल्य विकसित करण्याची संधी मिळते व त्यांचे व्यक्तिमत्व सुधारते.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी बीबीए या कोर्ससाठी प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. प्रवेश संख्या मर्यादित आहे तरी इच्छुक पालक व पाल्यांनी त्वरित संस्थेला भेट द्यावी व आपला प्रवेश निश्चित करावा. आपल्या भविष्यला योग्य कलाटणी देण्यासाठी अकलूज येथील शिवरात्न इन्स्टिट्यूट संचलित शिवरत्न इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (शिवरत्न नॉलेज सिटी) या महाविद्यालयाला भेट देऊन तेथील प्राध्यापकांकडून सदर कोर्स संबंधी माहिती मिळवून आपले भविष्य उज्ज्वल करून घ्या!

**- प्रा. सविता उप्पल्ली.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# मंजूर रस्त्यावरुन भाजप नेत्यांमध्ये रंगले श्रेयवादाचे राजकारण

## आपलेच घोडे दामटण्याचा सुरु आहे केविलवाणा प्रयत्न

सुराज्य/सोलापूर

**शहर उत्तरमधील कोंतम चौक ते कुंभारवेस येथील मंजूर रस्त्याच्या कामावरून भाजपमधील नेत्यांमध्येच श्रेयवादासाठी कलगीतुरा रंगल्याचे दिसून येत आहे. भाजपचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांनी हा रस्ता आ. विजयकुमार देशमुख यांच्या प्रयत्नामुळे झाल्याचा दावा केला तर दुसरीकडे माजी पक्षनेते सुरेश पाटील यांनी आपल्या प्रयत्नातूनच हा रस्ता मंजूर झाल्याचा दावा केला आहे. दरम्यान या परिसरात सुरेश पाटील यांच्या प्रयत्नातून रस्ता झाल्याचे फलकही लावण्यात आले आहेत.**

कोंतम चौक ते कुंभारवेस आणि पुढे पाच कंदील दिव्यापासून पुढे चिराग अली ताक्यापर्यंत जाणारा शहरातील मुख्य बाजारपेठेतला हा रस्ता आहे. या रस्त्यावर नेहमीच वाहनांची मोठी वर्दळ असते पण मागील काही दिवसांपासून हा रस्ता पूर्णपणे उखडलेला होता. मंगळवार बाजार पेठेकडे येणारा रस्ता दुरुस्त करून मिळावा, अशी मागणी देखील स्थानिक रहिवाशी आणि व्यापाऱ्यांकडून करण्यात आली होती.

सोमवारी पाच कंदील चौकात आ. विजयकुमार देशमुख, भाजपाचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख, गणपत मिरजकर, राजुशेठ ओस्वाल, शिवानंद सावळगी, माजी सभागृह नेते संजय कोळी, माजी नगरसेविका अंबिका पाटील, विजयालक्ष्मी गड्डम, बाबूराव जमादार, राजकुमार पाटील आणि शिवराज पाटील आदींच्या प्रमुख उपस्थितीत रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. या मार्गावरचे नवीनच रस्ते तयार करण्यासाठी केंद्राचा निधी उपलब्ध करून घेतला आहे, अशी माहिती आ. देशमुख यांनी आपल्या भाषणातून दिली.

हा रस्ता आता मंजूर झाला आहे. मात्र हा रस्ता कोणाच्या प्रयत्नातून मंजूर झाला यावरून यात श्रेयवादाचे राजकारण रंगले आहे.

आ. विजयकुमार देशमुख यांनी एनसीएपी या केंद्रीय योजनेंतर्गत कोंतम चौक येथील महात्मा बसवेश्वर पुतळा ते कुंभारवेस पाच कंदील स्तंभ ते विकास लॉजपर्यंत रस्ता डांबरीकरण आणि कुंभारवेस चौक ते तुळजापूरवेस चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करण्यासाठी निधी मंजूर करून घेतल्याचे त्यांचे समर्थक सांगत आहेत. तर दुसरीकडे सुरेश पाटील हे आपण तीन वर्ष सातत्याने या रस्त्यासाठी आंदोलन करत होतो.

मंगळवेढ्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना याबाबत निवेदनही दिले होते, त्या प्रयत्नातून हा रस्ता मंजूर झाल्याचे म्हणत आहेत.

### देशमुख कोणाला म्हणाले, झारीतील शुक्राचार्य

या भागातील नगरसेवक चांगले काम करत आहेत. मात्र काही झारीतील शुक्राचार्य आहेत, त्यांच्यामुळे विनाकारण कामास विलंब होत आहे. ते प्रशासनातील असतील किंवा अन्य कोण असतील त्यामुळे नागरिकांना वेठीस धरले जात आहे, असे भाषणात शहराध्यक्ष विक्रम देशमुख म्हणाले. आता देशमुख कोणाला झारीतील शुक्राचार्य म्हणाले, याची चर्चा सुरू झाली आहे.

### हा रस्ता कोणामुळे झाला सर्वांना माहिती आहे : पाटील

या रस्त्यासाठी आपण सातत्याने दोन- तीन वर्षे आंदोलने केली आहेत. यामध्ये या भागातील व्यापारीही सहभागी होते. रस्त्याच्या निधीसाठी पालकमंत्री विखे-पाटील यांची भेट घेऊन निधीची मागणी केली होती. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टीही उपस्थित होते. त्यामुळे जनतेला, व्यापाऱ्यांना माहिती आहे, की या रस्त्यासाठी कोणी प्रयत्न केले आहते. या भागातील व्यापाऱ्यांनी हे फलक लावले आहेत. लवकरच या रस्त्याचा उद्घाटनाचाही कार्यक्रम घेऊ, असे सुरेश पाटील म्हणाले.

# युनायटेड इन्श्युरन्सतर्फे सोलापुरात प्रभातफेरी

**सोलापूर** : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड, विभागीय कार्यालय, सोलापूरतर्फे प्रभातफेरी काढण्यात आली. प्रभातफेरी विभागीय कार्यालय, नवी पेठ येथून सुरु होऊन मेकॅनिक चौक, सरस्वती चौक, पार्क चौक, सिध्देश्वर मंदिर, लक्ष्मी पेठ, दत्त चौक या मार्गे फिरून नवी पेठ येथे समारोप झाला. सदर प्रभात फेरी ही स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणे तसेच जनसामान्यांमध्ये रस्ता सुरक्षा, वाहतुकीचे नियम, वाहन विमा याविषयी जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित केली होती. प्रधानमंत्री घोषित पंचप्राण, आत्मनिर्भर भारत व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त जनभागीदारीमार्फत अल्प दरातील जनता अपघात विमा, वैयक्तिक अपघात विमा, आरोग्य विमा, वाहन विमा, सरल सुरक्षा विमा इ. चा जास्तीत जास्त जनतेने लाभ घ्यावा, असे आवाहन वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक एच. पी. लगड यांनी केले. या प्रभात फेरीमध्ये वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक एच. पी. लगड तसेच सुनील सफार, सचिन गायकवाड, देविदास कोनापुरे, महेश कोटमाळे, सिद्राम काळे, महेश भोसले इ. कर्मचारी, विमा सल्लागार व सर्वेअर सामील झाले होते.

# बारावी परीक्षेत विविध महाविद्यालयांचे यश

## सोनी महाविद्यालय

**सोलापूर** : फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२वीच्या परीक्षेचा देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी महाविद्यालयाचा सायन्स व वाणिज्य विभागाचा निकाल १०० टक्के लागला. सोनी महाविद्यालयाची ही सलग आठवी बॅच असून सातत्याने आठव्या वर्षीही १०० टक्के निकाल लागला असून विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करुन नावलौकिक कायम राखला. वाणिज्य शाखेतून गिरीराज भुतडा ९४.६७ टक्के प्रथम, पृथ्वीराज घोरपडे ९४.५० टक्के द्वितीय, विशाल यंगली व आर्या जोकारे अनुक्रम ९०.५० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. तसेच वाणिज्य शाखेतून गिरीराज भुतडा, पृथ्वीराज घोरपडे, विशाल यंगली या विद्यार्थ्यांना गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले असून अकाऊंट विषयात गिरीराज भुतडा, पृथ्वीराज घोरपडे या विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९९ गुण मिळाले आहेत. वाणिज्य शाखेतून विशेष प्राविण्यासह ३३ टक्के विद्यार्थी तसेच प्रथम श्रेणीत ४२ टक्के उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेतून प्रद्युम्न ईश्वरकट्टी ८३.८३ टक्के, वंश पटेल ८३.८३ टक्के गुण मिळवून दोघेही प्रथम, रितेश हातगोंड ८३.६६ टक्के गुण मिळवून द्वितीय, आदित्य मिठ्ठा ८३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. विज्ञान विभागातून विशेष प्राविण्यासह ५० टक्के विद्यार्थी तसेच प्रथम श्रेणीत ५० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत सोमाणी, आनंद भंडारी, सहसचिव मधुसूदन करवा व इतर सर्व व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वासंती अय्यर, उपप्राचार्या हरदीप बोमरा व महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंदांनी अभिनंदन केले.

## इंगळगी महाविद्यालय

निलमनगर भाग ३ व ४ येथील कै. आय. एस. इंगळगी महाविद्यालयाचा निकाल ८२.०२ टक्के लागला. विज्ञान विभाग ७७.७७ टक्के, वाणिज्य विभागाचा ९४.११ तर कला विभागाचा निकाल ७२.९७ टक्के लागला आहे. विज्ञान विभागात प्रथम क्रमांक लक्ष्मी ज्ञानेश्वर दिकोंडा ६१.५० टक्के, द्वितीय महेजबीन इब्राहिम पटेल ५९.१७ टक्के. वाणिज्य विभागात प्रथम क्रमांक कविता प्रकाशन देगील ६९.६७ टक्के, द्वितीय क्रमांक श्रुतिका बाललिंग कामूर्ती ६७.५० टक्के, तृतीय क्रमांक अनिषा मल्लिकार्जुन साखरे ५५ टक्के, कला विभागात प्रथम क्रमांक श्रीकांत सुधीर धुमाळ ६५.५० टक्के, द्वितीय क्रमांक सागर बसवराज कलशेट्टी ५८.५० टक्के तर तृतीय क्रमांक सौरभ सचिन मुगळे ५७.८३ टक्के. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक हारुण पठाण, सचिवा मुमताज शेख, महाविद्यालयाच्या प्राचार्य सय्यद आफरीन, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका तस्लीमबानो पठाण व शाळेतील सर्व शिक्षकवृंदांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## व्ही. जी. शिवदारे ज्युनिअर महाविद्यालय

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही. जी. शिवदारे ज्युनिअर महाविद्यालयाने याहीवर्षी उच्च माध्यमिक परीक्षा मार्च २०२३ मध्ये १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली. व्ही. जी. शिवदारे ज्युनिअर महाविद्यालय जुळे-सोलापूर याठिकाणी स्थित आहे. कै. शिवदारे अण्णा यांच्या विचार आणि कृतीने पावन झालेल्या या कॉलेजने सोलापूर जिल्ह्यामध्ये अल्पावधीतच नावलौकिक मिळविला आहे. सानिया पठाण या विद्यार्थिनीने प्रथम येण्याचा बहुमान मिळविला. आशीर्वाद हक्के हा द्वितीय तर आश्लेषा राजुले हिने महाविद्यालयात तृतीय क्रमांक पटकाविला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे चेअरमन राजशेखर शिवदारे, संस्थेचे विश्वस्त प्रा. भिमाशंकर शेटे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. सुत्रावे, प्र. प्राचार्या एस. एस. गायकवाड, डॉ. ए. बी. वळसंगे यांनी अभिनंदन केले.



# लग्नाला पन्नास वर्षे पूर्ण झालेल्या आठ जोडप्यांचे शुभमंगल

### श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन आणि पद्मशाली सप्तपदीच्या वतीने अनोखा उपक्रम

सुराज्य/सोलापूर

आजकालच्या नवविवाहित जोडपे लग्नाच्या काही वर्षानंतर किरकोळ घटना, मन (ईगो) दुखावल्यामुळे घटस्फोट घेण्याइतपत निर्णय घेत आहेत. यामुळे संसार आणि मुले उघड्यावर पडत आहे. ही समस्या अनेक समाजात घडत आहे, अशा घटनांवर किंचितसा प्रभाव पडावा या उद्देशाने सुखाने संसार करणा-या व लग्नास पन्नास वर्षे पूर्ण झाले अशा आठ आजी - आजोबांचे पुन्हा विवाह सोहळा (महोत्सवम) गोरज मुहूर्तावर गुलाब पाकळ्यांच्या अक्षतारुपी शुभेच्छेने सोमवारी संध्याकाळी करण्यात आले आहे.

दाजी पेठेतील श्रीराम मंदिर येथे प्रारंभी श्री गणेश पूजा, श्री लक्ष्मी-नारायण पूजा व महर्षी मार्कंडेय महामुनींचे पूजा अनुक्रमे यंत्रमाग कारखनदार रघुरामुलू कंदीकटला, सामाजिक कार्यकर्ते गोपीकृष्ण वड्डेपल्ली आणि माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांच्या यांच्या हस्ते करुन आठ जोडप्यांना कंदीकटला तर्फे टोपी, टॉवेल, वड्डेपल्ली तर्फे साडी - चोळी आणि कोठे तर्फे पुष्पहार देण्यात आले. यावेळी आजी-आजोबा एकमेकांना हार घातल्यावर पद्मशाली पुरोहित संघमच्या वतीने आशिर्वचनपर शुभेच्छा दिल्यानंतर उपस्थित सर्व व-हाडी मंडळी अक्षतारुपी शुभेच्छा 'गुलाब पाकळ्यांनी' दिल्या. पद्मशाली पुरोहित संघमचे अध्यक्ष देविदास अन्नलदास यांच्या मार्गदर्शनाखाली वेणुगोपाल म्याना, ओमप्रकाश सामल, अविनाश श्रीमल, अरविंद जिल्ला, हरिकृष्णा नल्ला, नागेश अंकम,सुधीर सोमा यांनी पौरोहित्य केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गौरीशंकर कोंडा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संकल्पनेतून, मार्गदर्शक गणेश पेनगोंडा, सल्लागार सुकुमार सिध्दम, दयानंद कोंडाबत्तीनी, उपाध्यक्ष नागेश पासकंटी, श्रीनिवास कामूर्ती, नागेश सरगम, सदस्य किशोर व्यंकटगिरी वैकुंठ म. जडल, श्रीनिवास पोटाबत्ती, पद्मशाली सखी संघमच्या सचिवा ममता मुदगुंडी, सहसचिवा जमुना इंदापूरे, सहखजिनदार ममता तलकोकूल आणि विमल पुट्टा यांचे सहकार्य मिळाले.

याप्रसंगी सोलापूर पद्मशाली ज्ञाती संस्थेचे विश्वस्त आणि माजी महापौर जनार्दन कारमपूरी, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमचे अध्यक्ष महेश कोठे, यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप,अखिल भारत पद्मशाली संघमचे सचिव सत्यनारायण गुर्रम, महाराष्ट्र पद्मशाली संघमचे अध्यक्ष भूपती कमटम, ज्ञाती संस्थेचे सचिव संतोष सोमा उपस्थित होते.

# दारू पाज म्हणत डोक्यात फोडली सोड्याची बाटली

सुराज्य/सोलापूर




दारू पाज असे म्हणून शिवीगाळ करत लाकडी बांबूने मारहाण करून डोक्यात सोड्याची बाटली फोडल्याप्रकरणी दोघाजणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २९ मे रोजी सायंकाळी पाच च्या सुमारास बारा मोरी कस्तुरबा मार्केट बाळीवेस येथे घडली. याप्रकरणी गौतम सिद्राम शिंगे (वय-४८,रा.बुधवार पेठ,माने वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून श्रीकांत कांबळे व रवी कांबळे (दोघे रा.न्यू बुधवार पेठ) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. रवी कांबळे हा दारू पाज असे म्हणून गौतम यांना शिवीगाळ करू लागला.त्यावेळी गौतमने पैसे नसल्याचे सांगत त्यास नकार दिला. त्यावेळी गौतम यांना मारहाण केली. रवी कांबळे यांनी सोड्याची बाटली डोक्यात मारून जखमी केले आहे. पो. हे.कॉ. ओव्होळ तपास करीत आहेत.

### विवाहितेला दिले हाकलून

लग्नात योग्य मानपान केला नाही, तसेच माहेरून दोन तोळे सोने,एक लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेला शिवीगाळ करत मारहाण केली व पतीने मी तुला नांदवणार नाही दुसरे लग्न करणार आहे असे म्हणून विवाहितेचा छळ करत हाकलून दिल्याप्रकरणी पतीसह तीन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. ६ नोव्हेंबर २०२२ ते १४ फेब्रुवारी २०२३ पर्यंतच्या दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली.याप्रकरणी स्वीटी राजेश अनपुरकर (वय-३१, रा.गुलजार चौक, लष्कर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती राजेश तिपण्णा अनपुरकर, नणंद संगीता अनपुरकर व संजना अंकुरकर (रा.गुलाबवाडी, कलबुर्गी, कर्नाटक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल कंचे हे करीत आहेत.

## एकता नगर येथे आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : एकता नगर येथील सत्यम हॉटेल जवळ राहणाऱ्या संदीप सिद्धप्पा बिराजदार (वय ४०) याने विषारी द्रव आणि झोपेच्या गोळ्या सेवन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

त्याला उपचारासाठी आरती (पत्नी) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले. प्रॉपर्टी विकण्याच्या कारणावरून त्याने हा प्रकार केला, अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.



# आंबा बागांची छाटणी शास्त्रोक्त पद्धतीनेच करा अथवा छाटणी टाळा : नलावडे

सुराज्य/निमगाव

सघन पद्धतीने आंबा लागवडीचे क्षेत्र वाढत चालले असून आंबा बागांची छाटणी शेतकरी चुकिच्या व वेगवेगळ्या पद्धतीने करीत आहेत. यामुळे उत्पादन खर्च वाढून त्यांच्या उत्पन्नात घट होत आहे. यासाठी आंबा बागांची छाटणी ही गरज असल्यासच शस्त्रोक्त पद्धतीने करा अथवा छाटणी टाळा, असे स्पष्ट मत महादेश फार्मर प्रोडूसर कंपनीचे चेअरमन सचिन नलावडे यांनी मांडले.

ते निमगाव ता माळशिरस येथे आंबा बागायतदार निनाद पाटील यांच्या बागेत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत बोलत होते यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, लेखक, कवी, निमगावचे माजी सरपंच हनुमंत पवार हे होते पुढे बोलताना नलावडे म्हणाले कि, १४ बाय ३ या अंतरावरच सघन पद्धतीने लागवड करावी आंबा लागवड करीत असताना खड्डे न काढता सलग ४ फूट खोलीचा चर घेऊन त्यामध्ये पालापाचोळा, लाकडी ओंडके ,टाकून त्यावर शेणखत टाकून आहे त्या मातीनेच खड्डा बुजवून घ्यावा व ड्रीपद्वारे संपूर्ण बेड ओला झाल्यानंतरच आंब्याची लागवड करावी आंबा लागवडीपासून ते आंबा काढणीपर्यंतच्या आंब्याला देण्यात येणारी खते, फवारण्या, कल्टर प्लीकेशन कशा पद्धतीने द्यावयाचे गरज असल्यासच छाटणी करताना कोणती फांदी काढायची याबाबतही त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले.

शेतकऱ्यांनी गट शेती करणे गरजेचे आहे यामुळे शेतकऱ्यांना घ्यावी लागणारी खते ,औषधे ही कमीत कमी खर्चात मिळतील यामुळे त्यांचा उत्पादन खर्च वाचून उत्पन्नही वाढेल असाही आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला यावेळी मल्हारी डोलारे यांनी सेंद्रिय शेती विषयक माहिती देऊन गांडूळ खत व सेंद्रिय शेती विषयी माहिती दिली कार्यक्रमासाठी महादेश फार्मर प्रोडूसर कंपनीचे विजय धुमाळ, शिवामृत चे संचालक हरिश्चंद्र मगर यांच्यासह निमगाव, वेळापूर, पिलीव, सांगोला ,अकलूज, बोरगाव आदी भागातील शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला होता कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश मगर तर प्रास्ताविक व आभार निनाद पाटील यांनी मानले

## कोर्सेगाव येथे कुऱ्हाडीने मारहाण

**अक्कलकोट** : कोरसेगाव (ता. अक्कलकोट) येथे पैशाच्या वादातून कुऱ्हाडीने केलेल्या मारहाणीत बाबासाहेब तिमण्णा वाघमारे (वय ३०) हे जखमी झाले. ही घटना सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी दीक्षा (पत्नी) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले. त्यांना लिंबण्णा सिद्धाराम उमदी याने मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# हुतात्मा स्मृती मंदिर भाडेवाढ रद्द करा : आ. प्रणिती शिंदे

सुराज्य/सोलापूर



आमदार प्रणिती शिंदे यांनी कलाकारांच्या कलेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि विविध कला जोपासण्यासाठी महानगरपालिकेकडून हुतात्मा स्मृती मंदिरची झालेली भाडेवाढ रद्द करण्यात यावी अशी मागणी मनपा आयुक्त यांना केली.

सोलापूर शहरातील हुतात्मा स्मृती मंदिर या सांस्कृतिक सभागृहाचे भाडेवाढ महानगरपालिकेकडून नुकतेच जाहीर करण्यात आले आहे. ही वाढ अत्यंत अवाजवी असून या सभागृहात होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांना खीळ घालणारी आहे.

पुणे, मुंबई, नाशिक या ठिकाण च्या होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांना भौगोलिक दृष्ट्या सोलापूर तसेही खर्चिक असल्यामुळे हुतात्मा स्मृती मंदिरची झालेली ही भाडेवाढ बाहेरील कलाकारांना न परवडणारी आहे. त्याचप्रमाणे सोलापुरातील हौशी कलाकारांना देखील ही वाढ जास्त आहे. सांस्कृतिक वातावरण टिकवून ठेवण्यासाठी सभागृह वाजवी दरात मिळणे अत्यंत आवश्यक आहे. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा सोलापूर व कार्यकारी सदस्य अखिल भारतीय नाट्य परिषद, मुंबई चे पदाधिकारी उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर : आ. राम सातपुते

### निवडणुकीच्या जाहीरनाम्यातील आश्वासनाची पूर्तता जयंतीच्या पूर्वसंध्येला केली पूर्ण

सुराज्य/निमगाव

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यांनी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व आ रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माळशिरस तालुक्यात मोटेवाडी येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाले असल्याची माहिती आ राम सातपुते यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

२०१९ विधानसभेच्या निवडणुकीमध्ये जाहीरनाम्यात अहिल्यादेवी होळकर स्मारक उभा करणार असे आश्वासन आ राम सातपुते यांनी दिलेले होते ते आश्वासन अहिल्यादेवी जयंती च्या पूर्वसध्येला माळशिरस ,मोटेवाडी येथे दोन कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे हे शक्य झाले असल्याचे आ राम सातपुते यांनी सांगितले

यावेळी पुढे बोलताना आ सातपुते म्हणाले की, माळशिरस तालुक्यात अनेक विकास कामे केली रस्ते ,वीज ,पाणी, आरोग्य, स्वच्छता, मंदिरांना सभामंडप आदी विविध योजना मार्गी लावल्या. तालुक्यातील एकही गाव किंवा वाडी वस्ती विकासापासून वंचित ठेवली नाही वचननाम्यात वचन दिल्याप्रमाणे अहिल्यादेवी स्मारकाचा प्रश्न मनात होता तो आज मिटलेला आहे. जनतेला दिलेला शब्द तो आज पूर्ण केल्यामुळे तालुक्यात आनंद व्यक्त केला जात आहे .दोन कोटी निधीपैकी ५० लाखाचा पहिला टप्पा मंजूर झालेला आहे.



## निधन वृत्त

### अभिमान कांबळे



**अकलूज** : पंढरपूर तालुक्यातील उंबरगाव येथील अभिमान लक्ष्मण कांबळे यांचे नुकतेच वयाच्या ७३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक विवाहित मुलगा आणि दोन विवाहित मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे. उंबरगाव ग्रामपंचायत पाणी पुरवठा विभाग प्रमुख दत्ता कांबळे यांचे ते वडील होते.

### सुरेंद्र भालेराव



**सोलापूर** : कुमठा नाका येथील रहिवाशी सुरेंद्र शंकर भालेराव (वय ७२ वर्षे) यांचं हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, एक मुलगा, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. येथील स्नेहपुष्प मित्र मंडळाचे सचिव कपिल भालेराव यांचे ते वडिल होत.

### कमलाबाई मंगरुळे



**अक्कलकोट** : येथील शेतकरी दत्तात्रय बसवणप्पा मंगरुळे यांचे धर्मपत्नी कमलाबाई दत्तात्रय मंगरुळे ( वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा बुधवारी (दि. ३१) सकाळी दहा वाजता मेन रोड जनता बँक पाठीमागील त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, पाच मुली, जावई, सुन व नातवंडे असा परिवार आहे. सी. बी. खेडगी महाविद्यालयातील माजी प्रबंधक रेवणसिध्द मंगरुळे यांच्या त्या मातोश्री होत.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा सूचना

महावितरण सोलापूर शहर विभागांतर्गत नामिकाप्रविष्ट (Empeanelment) योजनेअंतर्गत नवीन वीजजोडणी/डीपीडीसी/कृषी ऊर्जा धोरण/१००% डीडीपीच्या कामाकरिता अनुभवी ठेकेदारांकडून सन २०२३-२४ (१ वर्षाकरिता ) या कालावधीसाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा क्र. EE/SUR/U/T/०२/ २०२३-२४ असून, निविदा विक्री दि. ३१.०५.२०२३ ते ०७.०६.२०२३ पर्यंत आहे. (निविदा किंमत अंदाजे २५०.०० लाख) निविदा सादर करण्याची अंतिम दि. ०८.०६.२०२३ सकाळी ११:०० वाजेपर्यंत राहील. सदर तपशील महावितरण कंपनीच्या अधिकृत http://works.mahadiscom.in/eTender/etender संकेतस्थळावर उपलब्ध असेल. सदरील निविदा स्वीकारणे/ नाकारणे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीदाराकडे राहतील.

कार्यकारी अभियंता,
महावितरण, सोलापूर शहर विभाग

PRO/BMTZ/०३५/२०२३-२४

# जिल्हा परिषद राबविणार एक कुटूंब–एक वृक्ष अभियान

सुराज्य/सोलापूर

पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी जिल्हा परिषदेतर्फे लवकरच एक कुटुंब एक वृक्ष अभियान राबविण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली.

आज मानवाने आपल्या नवनवीन शोधाच्या अभिलाषेमुळे पर्यावरणाला नुकसान पोहचवणे सुरू केले आहे. अशा काळात पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज झाली आहे. पृथ्वीवरील अनेक प्राणी आपल्या अन्नासाठी वृक्षांवर अवलंबून आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे मनुष्य हवेत असलेला ऑक्सिजन हा प्राणवायू श्वासाद्वारे ग्रहण करतो. अशा पद्धतीने वृक्ष, मनुष्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. मागील काही वर्षांमध्ये देशातील कारखान्यांची संख्या वाढली आहे. या कारखान्यात लागणारा कच्चामाल तसेच देशातील वाढती लोकसंख्या अशा अनेक गोष्टी वृक्षतोडीसाठी कारणीभूत आहेत.

देशात होत असलेला पर्यावरणाचा होस वेळीच रोखण्यात आला नाही तर येत्या काळात ही खूप मोठी समस्या बनून जाईल. पर्यावरण आपले भविष्य आहे म्हणून याच्या संरक्षणासाठी आपल्याला वेळीच लक्ष दयावे लागेल.

पर्यावरणाला प्रदूषण आणि शोषण पासून वाचवण्याच्या प्रक्रियेला 'पर्यावरण संवर्धन' म्हटले जाते. कॉन्फरन्स ऑफ पार्टीजची दरवर्षी विविध देशामध्ये परिषद होत असते. त्याप्रमाणे, ग्लासगो (यु.के) येथे नोव्हेंबर २०२१ मध्ये झालेल्या उजझ २६ च्या आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताचे माननीय पंतप्रधान महोदयांनी पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी Mindful and deliberate utilization instead of mindless and destructive consumption यासाठी जन चळवळ म्हणून मिशन लाईफ (MissionLIFE-Life style for Environment) राबविण्याचे जाहिर केले आहे. सोलापूर जिल्हयामध्ये वृक्ष संवर्धनासाठी मागील वर्षी एक पद-एक वृक्ष आषाढी वारींच्या पालखी मार्गावरील गावामध्ये हरित वारी अंतर्गत १०००० वृक्ष लागवड कार्यक्रम है उपक्रम राबविण्यात आले आहेत.

# अक्कलकोट येथे बेकायदेशीर सावकारी; भरारी पथकाने टाकली धाड,गुन्हा दाखल

सुराज्य/अक्कलकोट



अक्कलकोट तालुका अवैध सावकारी भरारी पथकाने अवैध सावकार धानव्वा (धानम्मा) इरय्या स्वामी (रा. बुधवार पेठ अक्कलकोट) यांच्या घरावर धाड घालून आक्षेपार्ह कागदपत्रे व खरेदी दस्त, उसनवार पावती, धनादेश इत्यादी कागदपत्रे जप्त केली. त्यांच्यावर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत कलम ३९ नुसार उत्तर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला.

अक्कलकोट शहरातील अवैध सावकारी करणाऱ्या धानव्वा (धानम्मा) इरय्या स्वामी यांच्या घरावर दि. २२मे २०२३ रोजी सायंकाळी ४ वाजता सावकारी भरारी पथकाने धाड टाकली असता अवैध सावकारी बाबत आक्षेपार्ह कागदपत्रे आढळून आली. त्याबाबत अर्जदार अशोक हणमंत चौगुले, (रा. सोलापूर) यांनी त्यांच्या घरगुती अडचणीसाठी अवैध सावकार धानव्वा (धानम्मा) इरय्या स्वामी यांच्याकडून २७ दराने रक्कम चार लाख रूपये घेतले होते. त्याबदल्यात त्यांची स्वमालकीची अक्कलकोट येथील गट नं. ९६९ शेतजमीन सन २०१७ रोजी ८१.०० आर जमीन पैशाच्या मोबदल्यात खरेदी करुन घेण्यांत आली.सदर शेतजमीन मुद्दल व होणारे व्याज मिळाल्यानंतर परत द्यावयाच्या अटीवर सावकार यांचे नावे लिहून दिली. सदर सावकारास मुद्दल रु.४ लाख त्यावर होणारे व्याजाची रक्कम खरेदी घेतल्यापासून दोन वर्षाचे व्याज दिलेले होते. तदनंतर अर्जदार यांच्या मुलाचा अपघात झाल्याने त्यावेळी त्यांना मुद्दलापैकी रक्कम एक लाख दिलेली होती. अजून मुद्दल व व्याज मिळून पंचवीस लाखांची मागणी करुन सदर जमीन हडप करण्यांचा प्रयत्न केल्यामुळे चौगुले यांनी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत सावकारांचा सहाय्यक निबंधक, तथा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अक्कलकोट, ता. अक्कलकोट यांच्याकडे तक्रारअर्ज सादर केलेला होता. त्यानुसार तालुक्याच्या भरारी पथकाने अवैध सावकार धानव्वा (धानम्मा) इरय्या स्वामी यांच्या घरावर धाड घालून आक्षेपार्ह कागदपत्रे व खरेदी दस्त जप्त, उसनवार पावती, धनादेश इत्यादी कागदपत्रे जप्त केली आहे. धानव्वा (धानम्मा ) इरय्या स्वामी याच्यावर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत कलम ३९ नुसार गुन्हा दाखल झाला.

फिर्याद सिध्देश्वर कुंभार यांनी दिली. सदर कार्यवाही सावकारांचा निबंधक, तथा जिल्हा उपनिबंधक सोलापूरचे किरण गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निबंधक शामराव दडस यांच्या पथकाने केली. या पथकातील पथक प्रमुख सिध्देश्वर कुंभार व छाया नाटकर व के. बी. जमादार यांनी व पोलीस खात्यातील कर्मचारी एस. एस. राठोड, जे. एस. सगुमळे, उत्तर पोलीस ठाणे व पंच साक्षीदार यांचा समावेश होता. अवैध सावकारी बाबत काही तक्रार असल्यास कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन निबंधक कार्यालयाने केले.



## वीज पुरवठ्यात तांत्रिक बिघाडामुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळाली

### राष्ट्रवादीचे महावितरणला निवेदन

**सोलापूर** : सोलापूर शहरात सोमवारी झालेल्या अवकाळी पावसामुळे वीज पुरवठ्यात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे माशाळवस्ती ,आत्मविश्वास नगर ,योगीराजेंद्र नगर या भागातील रहिवाशांचे इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळाली आहेत. त्याची नुकसान भरपाई द्या, संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करा अशा मागणीची निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस प्रभाग क्रमांक २३ च्या वतीने महावितरण अधीक्षक अभियंता मेहता यांना मंगळवारी देण्यात आले. सोमवारी रात्री वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. वीज पुरवठ्यात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे माशाळ वस्ती, आत्मविश्वास नगर, योगीराजेंद्र नगर या भागातील रहिवाशांचे टीव्ही ,फ्रिज ,मिक्सर, कुलर यासह इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळाली आहेत. याची चौकशी करून येथील रहिवाशांची नुकसान भरपाई द्या, कामात निष्काळजीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी वक्ता सेलचे अध्यक्ष नागेश निंबाळकर, राष्ट्रवादी प्र. क्र. २३ चे अध्यक्ष नवीद पिरजादे, जय हिंद गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष संजय मठपती, जय हिंद नवरात्र महोत्सव उपाध्यक्ष मयूर शेरखाने आदी उपस्थित होते.

## कर सल्लागार संघटनेच्या अध्यक्षपदी ॲड. विनायक नगरकर





**सोलापूर** : द इन्कम टॅक्स अँड सेल टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन या कर सल्लागार संघटनेच्या अध्यक्षपदी ॲड. विनायक नगरकर यांची निवड करण्यात आली. तर सचिवपदी ॲड. विकास कोडमूर यांची निवड झाली. द इन्कम टॅक्स अँड सेल टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. या सभेत नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सभेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कर सल्लागार ॲड. उपेंद्र पोफळीकर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मावळते सचिव ॲड. अक्षय अंदोरे यांनी तर प्रास्ताविक मावळते अध्यक्ष विश्वंभर पाटील यांनी केले. कर सल्लागार संघटनेची नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष - ॲड. विनायक नगरकर, उपाध्यक्ष - ॲड. किसन बिल्ला, सचिव - ॲड. विकास कोडमूर, सहसचिव - सागर अरकाल. आभार प्रदर्शन मावळते सचिव ॲड. अक्षय अंदोरे यांनी केले. याप्रसंगी ॲड. एम पी कोरुलकर, ॲड. एम. के. पाटील, सी. बी. शिरसोडे, ॲड. अरविंद शहा, ॲड. विजयकुमार कोनापुरे, ॲड. एस. एस. कोणशिरसगी, ॲड. आर. एम. हिरेमठ, ॲड. रफिक शेख, इद्रिस बागवान, ॲड. एस. एस. लोणी, ॲड. के. के. नागर आदी उपस्थित होते.

# तंबाखूमुक्त सोलापूरसाठी लोकसहभाग हवा

सुराज्य/सोलापूर



तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या व्यसनामुळे युवक पिढी कॅन्सरच्या आहारी जात असून मौखिक कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. कमावता युवक हा व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे कुटुंब व्यवस्था तसेच सामाजिक व्यवस्था कोलमडली आहे. तंबाखूमुक्त सोलापूर करण्यासाठी लोकसहभाग वाढवून तंबाखू विरोधी चळवळ अधिक व्यापक करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन दिलीप स्वामी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांनी केले.

३१ मे जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यापीठात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध वक्तृत्व स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते.

सोलापूर जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था संभाजीनगर, पोलीस आयुक्तालय, सारथी फाऊंडेशनच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्र कुलगुरू पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ डॉ गौतम कांबळे हे होते.

याप्रसंगी कुलसचिव योगिनी घारे, समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर, पोलीस सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ धनंजय पाटील, विद्यापीठाचे एनएसएस विभाग प्रमुख राजेंद्र वडजे नशाबंदी मंडळाचे रुस्तुम कंपनी उपस्थित होते.

यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांनी व्यसनाधीनता आणि सामाजिक व्यवस्था यावर सखोल मार्गदर्शन केले. युवा वर्गाला कॅन्सर पासून वाचवण्यासाठी प्रभावी समुपदेशन करण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांनी केले तर अतिथींचा सत्कार विभागीय अधिकारी रंगनाथ जोशी यांनी केला.

## शेतातील ७ लाखांची केळी पळविली


**मोहोळ** : वृध्द चुलते आणि चुलतीला ढकलून देऊन धमकी देत शेतातील ५० टन केळी, ड्रीपचे साहित्य आणि इतर अवजारे असा ७ लाख ३५ हजार रुपये किमतीचा माल पळवून नेण्यात आले. ही घटना तेलंगवाडी (ता.मोहोळ ) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. यासंदर्भात मोहोळच्या पोलिसांनी तक्रारदाराच्या पुतण्यासह दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

व्यंकटराव कृष्णाजी थोरात (वय ८५ रा. तेलंगवाडी) हे काल सोमवारी सकाळी आपल्या शेतात काम करीत होते. त्यावेळी त्यांचा पुतण्या नामदेव भाऊराव थोरात आणि त्याचा मुलगा निखिल थोरात हे दोघे शेतात येऊन त्यांना आणि त्यांच्या पत्नीस शिवीगाळ करून धमकी देत ढकलून दिले. त्यानंतर शेतातील ७ लाख रुपये किमतीचे (५० टन) केळी, ड्रीपचे साहित्य आणि विद्युत मोटर आदी बळजबरीने घेऊन गेले असे. त्यांच्या फिर्यादी नमूद आहे. पुढील तपास हवालदार आदलिंगे करीत आहेत.

# चिमणी पाडकामाचे मक्तेदाराला आदेश

## ११ जून रोजी महापालिकेची मुदत संपणार

सुराज्य/सोलापूर



श्री सिध्देश्वर साखर कारखान्याची अवैध चिमणी स्वत:हून पाडण्यासाठी महापालिकेने कारखाना प्रशासनाला ४५ दिवसांची मुदत दिली आहे. ११ जून रोजी ही मुदत संपुष्टात येणार या पार्श्वभूमीवर महापालिकेने हैदराबादच्या मक्तेदाराला चिमणी पाडकामाची तयारी सुरु करावी, असे पत्र पाठवले आहे. दिनायस कॉन्ट्रक्ट प्रा. लि. या हैदराबाद येथील कंपनीला १.१७ कोटीला चिमणी पाडकामाचे टेंडर देण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्या उडान' योजनेत सोलापूरचा समावेश पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात देखील आहे. परंतु, जून २०१६ पासून अजूनही या योजनेअंतर्गत एकही विमान सोलापूर विमानतळावरून उडू शकलेले नाही. होटगी रोड विमानतळ परिसरातील श्री सिध्देश्वर साखर कारखान्याच्या को-जनरेशनची चिमणी विमानसेवेला प्रमुख अडथळा असल्याचे महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे. पण चिमणी बचावासाठी कारखान्याने अनेक वर्षे न्यायालयीन लढा लढला. यातच तारखावर तारखा निघून गेल्या. आता महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी कारखान्याला पत्र काढत ४५ दिवसांची मुदत दिली आहे. ११ जूनला ही मुदत संपुष्टात येणार आहे, त्या काळात कारखान्याने स्वत:हून चिमणी काढून न घेतल्यास महापालिका मक्तेदाराच्या माध्यमातून चिमणी हटवणार आहे. त्याअनुषंगाने आता महापालिकेने चिमणी पाडकामाच्या दृष्टीने तयारी सुरु केली आहे. दुसरीकडे असून मागील ३२ दिवसांत कारखान्याने त्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसत नाही. चिमणी पाडकामावेळी आवश्यकता भासल्यास कारखाना परिसरात तैनात केला जाणार पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात केला जाणार आहे.

## ब्लेडने वार आणि डोक्यात बाटली फोडून घेतल्याने तरुण जखमी

सुराज्य/सोलापूर

नशेत डोक्यात दारूची बाटली फोडून तसेच हातावर ब्लेडने वार करून घेतल्याची घटना एमआयडीसी परिसरातील मार्कंडेय नगरात रविवारी सायंकाळच्या सुमारास अजय मोहन लंबूवाले (वय २१ रा. हुच्चेश्वरनगर, कुमठानाका) असे जखमीचे नाव आहे. त्याला उपचारासाठी गणेश पंतुवाले (भाऊजी) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. अजय याने आज सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास मार्कंडेय नगर येथे स्वतःच्या डाव्या हातावर ब्लेडने वार करून घेतले होते. त्यानंतर दारूची बाटली डोक्यात मारून घेतल्याने जखमी झाला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

## भाजपाच्या नेत्यांनी सत्तेचा उपयोग स्वार्थीसाठी केला : वाले

सुराज्य/सोलापूर



केंद्रात, राज्यात अन सोलापुरात जनतेने भाजपाला मोठ्या अपेक्षेने सत्ता दिली. पण, भाजपाच्या नेत्यांनी त्या सत्तेचा उपयोग सोलापूरकरांसाठी न करता स्वतः च्या स्वार्थासाठी करुन घेतला. आता सर्व स्तरावर नापास झाल्यानंतर सोलापूरकरांची दिशाभूल करण्याचा खेळ भाजपा नेत्यांनी सुरु केला आहे अशी टिका काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष प्रकाश वाले यांनी केली.

ते म्हणाले, सोलापूर महापालिकेत भाजपाची पाच वर्षे सत्ता होती. या सत्तेच्या काळात स्थायी समितीला सभापतीदेखील भाजपाला देता आला नाही. शहरात प्यायला पाणी मिळत नाही. स्मार्ट सिटीची कामे निकृष्ठ दर्जाची झाली आहेत. दुहेरी जलवाहिनीचे कामही सुरु झालेले नाही. शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था आहे. शहरात एकही ठोस विकासकाम ते करु शकलेले नाहीत. काही कामांचे सुशोभिकरण करुन विकासकामांचे लोकार्पण करीत असल्याचा गवगवा केला जात आहे.

प्रत्यक्षात विकास कोठे आहे, हे आता भाजपाच्याच नेत्यांनी शोधावे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काही काँग्रेसमधील नेते व कार्यकत्यांनी भाजपात प्रवेश केल्याचे सांगण्यात येत आहे. पण, प्रत्यक्षात एकानेही काँग्रेस सोडलेली नाही. जे सोडले ते कायमच भाजपासोबत आहेत. आम्ही खूप कामे केली आहेत. इतर पक्षातील लोक आमच्याकडे येत आहेत. असेच भासविण्याचा प्रयत्न भाजपाकडून सुरु आहे, असेही प्रकाश वाले म्हणाले.

# महापालिका शाळेतील ११०९ विद्यार्थिनींना मिळणार उपस्थिती भत्ता

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिका महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत प्रोत्साहन म्हणून महापालिका शाळेतील १हजार १०९ विद्यार्थिनींना यावर्षीच्या ११० दिवसांचा शाळा उपस्थिती भत्ता देण्यात येणार आहे. त्यासाठी २ लाख ४३ हजार ९८० रुपये निधी महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी यांच्या अकाउंटवर पाठविण्यात आला आहे. त्यानंतर त्या त्या शाळेच्या मुख्याध्यापकांमार्फत विद्यार्थिनींना तो मिळणार आहे.

महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त विद्या पोळ व सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका महिलावबालकल्याणविभागांतर्गत विविध १७ नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत असलेल्या महापालिकेच्या विविध माध्यमांच्या शाळांमधील १ हजार १०९ विद्यार्थिनींना प्रोत्साहन म्हणून दररोज २ रुपये प्रमाणे शाळा उपस्थिती भत्ता शासन नियमानुसार देण्याची योजना आहे. महापालिका शाळेतील विद्यार्थिनींना प्रोत्साहन मिळावे म्हणून या योजनेअंतर्गत महापालिकेच्या विविध माध्यमांच्या एकूण ६१ शाळांमधील १ हजार १०९ विद्यार्थिनींना हा ११० दिवसांचा शाळा उपस्थिती भत्ता या शैक्षणिक वर्षात मिळणार आहे. दरम्यान, दररोज दोन रुपये प्रमाणे हा उपस्थिती भत्ता देण्यात येणार आहे.

### २.४३ लाख रुपये निधी शिक्षण मंडळाकडे वर्ग

#### ११० दिवसांचा उपस्थिती भत्ता मिळणार

रोज २ रुपये प्रमाणे प्रत्येक विद्यार्थिनीस प्रति महिना ६० रुपये प्रमाणे यावर्षी माहे डिसेंबर २०२२ ते मार्च २०२३ या दरम्यानचा ११० दिवसांचा उपस्थिती भत्ता मिळणार आहे. त्यासाठी २ लाख ४३ हजार ९८० रुपये निधी महापालिका लेखापाल विभागाकडून महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी यांच्या अकाउंटवर पाठविण्यात आला आहे.

#### २ दिवसांत रक्कम वर्ग होईल : प्रशासनाधिकारी जाधवर

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळ प्रशासनाकडून शाळांनिहाय मुख्याध्यापकांच्या अकाउंटवर २ दिवसांत वर्ग करण्यात येणार आहे. त्यानंतर हा उपस्थिती भत्ता त्या त्या शाळांच्या विद्यार्थिनींना वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी हनुमंत जाधवर यांनी दिली.

## १ लाख ८३ हजारांचे दागिने पळविले

सुराज्य/वेळापूर

तांदुळवाडी (ता.माळशिरस) येथे राहणाऱ्या दादासाहेब तानाजी करांडे यांच्या बंद घराची कोंडी उघडून चोरट्याने कपाटातील रोख रकमेसह १ लाख ८३ हजाराचे दागिने पळविले. ही चोरी सोमवारी पहाटे दीड वाजेच्या सुमारास घडली. यासंदर्भात करांडे यांनी वेळापूर पोलिसात फिर्याद दाखल केली. पहाटे दीड वाजेच्या सुमारास चोरट्याने दरवाजाची कोंडी उघडून घरात प्रवेश केला. आणि कपाटावरील चावी घेऊन कपाटातील ४२ ग्रॅम सोन्याचे आणि इतर चांदीचे दागिने घेतले. त्यानंतर त्यांच्या पॅन्टच्या खिशातील ८०० रुपये असा एकूण १ लाख ८३ हजाराचा माल चोरून नेला. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार मेहरकर हे करीत आहेत.

## महापालिकेची अतिक्रमण मोहीम सुरूच

### रेल्वे स्टेशन ते फॉरेस्ट, विजापूर रोड परिसरात कारवाई

सुराज्य/सोलापूर

शहरात मध्यवर्ती गजबजलेल्या ठिकाणी रहदारीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणाविरोधात महापालिका प्रशासनाने कडक मोहीम हाती घेतली आहे. मंगळवारी रेल्वे स्टेशन ते फॉरेस्ट तसेच विजापूर रोड परिसरातील अतिक्रमण हटविण्यात आले. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही धडक मोहीम राबविण्यात आली.

सोलापूर शहरात विविध बाजारपेठ व मध्यवर्ती गजबजलेल्या चौक परिसरांमध्ये रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविण्यासाठी महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने नियमितपणे नियोजनपूर्वक दररोज कारवाई हाती घेण्यात आली आहे.

शहरातील मध्यवर्ती गजबजलेले ठिकाण असलेले रेल्वे स्टेशन ते फॉरेस्ट या परिसरात रहदारी अडथळा ठरणारे अतिक्रमण महापालिका प्रशासनाकडून हटविण्यात आले. पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही धडक मोहीम राबविण्यात आली. अतिक्रमण विरोधी पथक पाहताच रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांची मोठी धावपळ उडाली. यावेळी अतिक्रमण विरोधी पथकाने या परिसरातील चार चाकी तीन गाड्या, प्लास्टिकचे कॅरेट यासह इतर साहित्य जप्त करण्याची कारवाई केली. रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे बांधण्यात आलेले कट्टे जमीनदोस्त करण्यात आले. दरम्यान, संध्याकाळी विजापूर रोड, छत्रपती संभाजी महाराज तलाव परिसर, इंचगिरी मठ या ठिकाणी कारवाई करण्यात आली. चार चाकी एक गाडी, बोर्ड, लोखंडी सामान आदी साहित्य जप्त करण्यात आले.





## राजमाता अहिल्यादेवींचे स्मारक उभे करा : शेखर खिलारे

**अकलूज** : अकलुज शहर सध्या महाराष्ट्रात मेडिकल हब तसेच पर्यटन स्थळे या दुष्टींने विकासासाठी प्रसिध्द होत असताना पर्यटक, व्यापारासाठी लोकांची आवक-जावक शहरात वाढत आहे. येणाऱ्या लोकांना स्मारकामुळे प्रेरणा व जगण्याची उर्मी मिळु शकते. युवासेना अकलुज शहराच्या वतींने आम्ही स्वखर्चाने अकलुज शहरातील लोकांना प्रेरणादायी असे अहिल्यादेवींचे स्मारक उभे करण्यासाठी प्रयत्न करु अशा आशयाचे निवेदन अकलूज शहर युवासेनेच्या वतीने शेखर खिलारे यांनी अहिल्यादेवी जयंतीच्या पुर्वसंध्येला प्रांत अधिकारी अकलूज नगरपरिषद मुख्याधिकारी अकलुज व विविध राजकिय पक्षप्रमुख यांना दिले आहे. सदर निवेदन देताना बच्चन साठे, केशव लोखंडे, अमोल भाउ चिकने इत्यादी कार्यकर्ते विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मराठा सेवा संघाच्या तालुकाध्यक्षपदी शहाजी इंगोले तर कार्याध्यक्ष पवार

**सांगोला** : मराठा सेवा संघाच्या सांगोला तालुकाध्यक्षपदी शहाजी इंगोले तर कार्याध्यक्षपदी मा ब्रह्मदेव पवार यांची व सचिवपदी मा अपुर्व थिटे यांची निवड करण्यात आली. सांगोला तालुका मराठा सेवा संघाच्या पदाधिकारी निवडी संदर्भात नुकतीच बैठक संपन्न झाली. या निवडीसाठी मराठा सेवा संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष मा उत्तमराव माने शेंडगे, पंढरपूर विभाग जिल्हाध्यक्ष मा तात्यासाहेब पाटील तर या निवडी प्रसंगी निरीक्षक म्हणून रवींद्र पवार व वनिता कोरटकर हे पदाधिकारी उपस्थित होते. या निवडी वेळी माजी नगरसेवक सतीश सावंत, रामभाऊ मिटकल शिवाजी गवळी प्रताप इंगोले, बापूसाहेब भाकरे, अशोक शिंनगारे, प्रताप देशमुख, बंडू निंबाळकर, संदीप गिड्डे, धनाजी शिकारे, बिरूदेव जावीर, रोहित शिकारी, वैभव शिकारे, धनाजी महाकाळ, मा विजय पवार व असंख्य मान्यवर उपस्थित होते. नूतन तालुकाध्यक्ष शहाजी इंगोले कार्याध्यक्ष ब्रह्मदेव बींपवार यांनी मनोगत व्यक्त करताना काम करण्याची संधी दिल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले. तसेच मराठा सेवा संघाच्या माध्यमातून समाजाच्या उन्नतीसाठी व प्रगतीसाठी योगदान देण्याचे आश्वासन दिले.




## 'उत्कृष्ट प्राचार्य' पुरस्कार डॉ.बागडे यांना प्रदान

**अकलूज** : अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे यांना दिल्ली येथील कॉमर्स ऑलिंपियाड फाऊंडेशन या संस्थेचा शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल 'उत्कृष्ट प्राचार्य' पुरस्कार देऊन दिल्ली येथे भारताचे दिल्ली सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांचे शुभ हस्ते प्रदान करण्यात आला.पुरस्कारामध्ये ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले आहे.हा पुरस्कार प्राचार्य दत्तात्रय बागडे यांनी ज्युनिअर आणि सिनिअर विभागातील शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल देण्यात आला आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल अकलूज शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते पाटील, संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील,संचालिका कु.स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी अभिनंदन केले.तसेच संस्थेचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील तसेच महाविद्यालयातील विविध विभागांचे प्रमुख आणि प्राध्यापक, कार्यालय अधिक्षक युवराज मालुसरे, ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक आर.के. इंगोले. प्रा.अनिल पराडे, प्रा. अविनाश जाधव, प्रा.गोरे, प्रा.सुलोचना देशमुख, प्रा.पद्मावती रहाटे, प्रा.रूपाली नवले व प्रशासकीय कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## कोर्टातील दाखल गुन्हा मागे घे म्हणून शिवीगाळ व धमकी

**कुर्डूवाडी** : कोर्टातील केस काढून घे म्हणून शिवीगाळ करत हातातील विळ्याने जखमी करुन कोर्टातील केस मागे घेतली नाही तर तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिल्या प्रकरणी कुर्डुवाडी पोलिसांत फिर्यादी भागवत दर्याबा मोठे (रा. महादेववाडी ता.माढा) यांच्या फिर्यादीवरुन जिवराज लिंबा मोठे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि. २९ रोजी रा. १.३० वा. सुमारास महादेववाडी (ता.माढा) येथे घडली. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की तानाजी जिवराज मोठे (रा. महादेववाडी ता.माढा) यांनी २००२ साली फिर्यादीच्या नावावरील अज्ञान पालन जमीन खरेदी केलेली होती. त्याचा वाद कोर्टात चालू आहे. दरम्यान दि. २९ रोजी रा.१.३० वा सुमारास फिर्यादी हे शेतात उसाची दारे धरण्यासाठी गेला असता तिथे जिवराज लिंबा मोठे हा आला आणि फिर्यादीला शिवीगाळ करत कोर्टातील केस काढून घे म्हणाला आणि त्याच्या हातातील विळ्याने फिर्यादीच्या पायावर, मांडीवर मारून जखमी केले. कोर्टातील केस मागे घेतली नाही तर तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली.

## पाकणी रेल्वे स्टेशनजवळ मालगाडीचे डबे रुळावरून घसरले

**उत्तर सोलापूर** : दौंडकडून सोलापूरच्या दिशेने येणारी मालगाडी मुंढेवाडी ते पाकणी रेल्वे स्टेशनच्या जवळ रुळावरून घसरली.दोन तासानंतर मालगाडी पुन्हा रुळावर आणण्यात आली. सांयकाळी साधारण पावणे पाचच्या दरम्यान वाजता घसरली. लुपलाईनवर आसल्याकारणाने गाडीचा वेग कमी होता. चार ते पाच डबे मेन लाईनवर असल्यामुळे रेल्वे वहातूक दोन ते आडीच तास खोळंबली होती. घटना समजताच आर पी एफ ऑफिसर सतिश विधाते फौज फाट्यासह दाखल झाले.दोन तासांनी रेल्वे वाहतूक सुरळीत करण्यात आली. यावेळी डि आर एम निरजकुमार धोरे, ए डि एन आलोरे, पी डब्ल्यू मुळे याच्यासह रेस्कयू टिमने मुंढेवाडीकडील डबे रेल्वे इंजन लाऊन मुंढेवाडी स्थानकाकडे नेण्यात आले. सांयकाळी साडेसात दरम्यान वाहतूकि मोकळी करण्यात आली.



# आई रागावल्याने वेळापूरच्या मुलीने गाठले कर्नाटक

## वेळापूर पोलिसांनी पुणेमार्गे बंगळुरू येथून लावला तपास

**सुराज्य/वेळापूर**

**आईने रागावल्याने घरातून निघून गेलेल्या मुलीला वेळापूर पोलिसांनी बेंगलोर येथून स्वगृही परत आणले. अल्पवयीन मुलीच्या आव्हानात्मक असणाऱ्या तपासामध्ये पोलिसांनी वेगाने केलेल्या कामगिरीमुळे वेळेत मुलीचा शोध लागला.**



वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील गावांमधील एक अल्पवयीन मुलगी अचानकपणे गायब झाली होती. सदर मुलीच्या आई-वडिलांनी मुलीचे नातेवाईक मित्र कंपनी यांच्याकडे चौकशी केली पण मुलीचा कुठेच पत्ता लागत नसल्याने शेवटी आई-वडिलांनी वेळापूर पोलीस स्टेशन येथे कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून मुलगी पळून नेल्याबाबत वेळापूर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली.

वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी अकलूज उपविभागीय अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी केलेल्या सूचनेनुसार गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक संजय राऊत व पोलीस हेकॉ. जनार्दन करे यांच्याकडे दिला. अल्पवयीन मुली बाबत वेगाने तपासास सुरुवात करण्यात आली होती. तपास कामी पोलिसांनी प्रयत्न केल्यानंतर सदरची मुलगी ही पहिल्यांदा पुणे येथे गेली असल्याची माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे सखोल तपास केला असता ही मुलगी पुण्यानंतर बेंगलोर येथे गेल्याचे निष्पन्न झाले. अल्पवयीन मुलगी ही दुसऱ्या राज्यात गेल्याने तिला ताब्यात घेणे अडचणीचे होते, पण पोलीस उपनिरीक्षक संजय राऊत व पोलीस हेकॉ. जनार्दन करे यांनी मिळालेल्या माहितीवरून त्यांनी त्वरित कर्नाटक राज्यातील बेंगलोर गाठले. जेथे अल्पवयीन मुलगी आहे. त्या परिसराची माहिती घेण्यास सुरुवात केली.

सदरची मुलगी मिळण्या कामी वेळापूर पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक अमोल वाघमोडे व सायबर चे अनवर आतार यांचेही मोठे सहकार्य लाभले. सदरची मुलगी बंगलोर येथील पोलिस स्टेशनला हजर करून सर्व कागदांची पूर्तता करून सलग चार दिवसाच्या तपासानंतर मुलगी वेळापूर पोलिसांच्या ताब्यात आली. त्यानंतर तिला वेळापूर पोलीस स्टेशन येथे आणून तिची चौकशी केली असता तिने आईने रागावल्याने घरातून एकटीच निघून गेल्याचे सांगितले. सदर मुलीचा वेळेत तपास करून आई-वडिलांच्या ताब्यात दिले आहे.

मुलीच्या पालकांनी मुलींमध्ये चांगले संस्कार निर्माण करावेत जेणेकरून आपला पाल्य प्रेमरुपी धाकापासून दूर जाणार नाही. याची काळजी घ्यावी. त्याचबरोबर प्रत्येक लहान मुलांचे/मुलींचे मोबाइल वापराकडे लक्ष पालकांनी द्यावे.

**- निलेश बागाव, वेळापूर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी**

### रिटायर मेजरच्या घरी घेतला आसरा

सलग तीन दिवस १०० मीटर अंतराच्या परिसरात त्या अल्पवयीन मुलीचा वेळापूर पोलीस शोध घेत होते. पण अल्पवयीन मुलगी मात्र सापडत नव्हती. शेवटी वेळापूर पोलिसांनी त्या परिसरात असलेल्या स्थानिक पोलीस स्टेशनला हजर होऊन मुलगी शोधण्यासाठी स्थानिक पोलिसांची मदत मागितली. त्या पोलिसांसमवेत त्या मुलीचा शोध घेतला असता सदर अल्पवयीन मुलगी ही विल्ला ३७ व्हाईट स्टोन रोसारो कुरुड सोनानहल्ली व्हाईट फिल्ड बेंगलोर येथे राहणाऱ्या रुचिका राजेश शेठ त्यांचे पती (रिटायर मेजर) यांच्याघरी पोलीस गेले असता सदरची मुलगी ही तुमच्याकडे असल्याचे सांगताच राजेश शेठ यांनी पोलिसांना सहकार्य करून ही मुलगी आमच्याकडे घरगुती कामाकरिता आली असल्याचे सांगून त्या मुलीला त्यांनी पोलिसा जवळील असलेल्या कागदपत्रांची खातर जमा करून मुलीला त्यांच्या ताब्यात दिले. सदरची मुलगी चांगल्या ठिकाणी गेल्याने मिळून आली. त्यामुळे वेळापूर पोलीसांनी एकदाशी सुस्कार सोडला.

## बंद घर फोडून ७४ हजारांची चोरी

**कुर्डूवाडी** : घराला कुलूप लाऊन कुर्डुवाडी येथे बँकेत पैसे काढण्यासाठी आले आणि तिकडे घराचा कडी कोयंडा तोडून ७४ हजारांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केला. ही घटना दि. २९ रोजी सकाळी ११ ते दु.२.१५ वा. दरम्यान म्हैसगाव (ता.माढा) येथे घडली. याबाबत सुभाष ज्ञानदेव उबाळे यांनी कुर्डुवाडी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादी हे महिंसगाव येथील आपल्या घराला कुलूप लावून पत्नीसह सकाळी ११ वा.कुर्डुवाडी येथे बँकेत पैसे काढण्यासाठी आले होते.फिर्यादी कुर्डुवाडी येथील कामकाज उरकून दु. २.१५ वा सुमारास महिंसगाव येथे घरी परतले असता घराचा कडीकोयंडा तुटलेला दिसला. घरातील लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडून लॉकर मधील ४० हजार रुपये किंमतीचे १ तोळा वजनाचे मिनीगंठन, २० हजार रुपये किंमतीचे अर्धा तोळा वजनाची सोन्याची अंगठी,८ हजार रुपये किंमतीची २ ग्रॅम वजनाची सोन्याची कानातील फुले व रोख ६ हजार रुपये असा एकूण ७४ हजारांचा ऐवज चोरट्याने लंपास केला. उबाळे यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## बलवडीपासून ते मेथवडेपर्यंत बंधारे भरून दिले जाणार

**सुराज्य/सांगोला**

टेंभू उपसा सिंचन योजनेतून आटपाडी तलावाच्या सांडव्यावरून ४०० क्यूसेक निसर्गाने पाणी माण नदीत सोडले जाणार आहे नदीवरील बलवडी पासून ते मेथवडे पर्यंत बंधारे पाण्याने भरून दिले जाणार असल्याची माहिती कार्यकारी अभियंता राजन रेडी यार यांनी दिली

उन्हाळ्यात माण नदीवरील बंधारे कोरडे पडल्याने उभी पिके व फळबागा पाण्याअभावी जळू लागले आहेत लाभधारक शेतकऱ्यांनी आमदार शहाजी बापू पाटील यांच्याकडे टेंभू योजनेतून माण नदीत पाणी सोडून बंधारे भरून देण्याची मागणी केली होती त्या संदर्भात आमदार शहाजी बापू पाटील यांनी टेंभू उपसा सिंचन प्रकल्प अधिकारी व शेतकरी यांच्या समवेत बैठक घेतली होती.



आमदार यांनी जनावरे व माणसांना शेती व फळ पिकासाठी टेंभू म्हैसाळ योजनेतून माण कोरडा बेलवण नद्यांमध्ये पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती जिल्हाधिकारी यांनाही तीन मे रोजी पत्र दिले होते मुख्यमंत्र्यांनी आमदार पाटील यांच्या पत्राची दखल घेऊन जिल्हाधिकारी यांना तातडीने पुढील कार्यवाही करावी अशा सूचना केल्या होत्या सांगोला तालुक्यातील ४५गावातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी अधीक्षक अभियंता सांगली पाटबंधारे मंडळ व कार्यकारी अभियंता टेम्पो सिंचन प्रकल्प व्यवस्थापन ओगलेवाडी यांच्याशी पत्रव्यवहार केला होता.

जिल्हाधिकारी सोलापूर व टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापनाने तातडीने माण नदीत पाणी सोडण्याचा घेतलेला निर्णय स्वागतर्ह आहे त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांची सोय होणार आहे पिकांनाही याचा फायदा होईल.

**- आ.शहाजीबापू पाटील**

## सुळेवाडी गावात एसटी थांबवण्याची मागणी मान्य

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी या गावात सोलापूर व सातारा आगाराच्या एसटी बसेस थांबविण्यात येत नाहीत. यामुळे विदयार्थी, नागरिक, पेशंट व परगावी जाणाऱ्यांची प्रचंड गैरसोय होत आहे.



अशा आशयाची मागणी विक्रम सुळे यांनी विभाग नियंत्रक सोलापूर, सातारा तसेच मुंबई यांच्याकडे ३ मे रोजी लेखी निवेदनादवारे मागणी केली होती. जर मागणी मान्य केली नाही तर रस्ता रोको करणार असल्याचा इशारा देण्यात आला होता सदरच्या मागणीचि दखल यापुढे सोलापूर व सातारा आगाराच्या सर्व एस टी बसेस सुळेवाडी बसस्थानकावर थांबतील असे लेखि पत्र विक्रम सुळे यांना आगाराकडुन देण्यात आले आहे.

## कुर्डूवाडी बस स्थानकावरून अज्ञान व्यक्तीने अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवले

**सुराज्य/कुर्डूवाडी**



कुर्डुवाडी बसस्थानकातून बार्शी येथील अल्पवयीन मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून फुस लावून पळवून नेल्याची फिर्याद कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे. ही घटना दि.२९ रोजी सकाळी ११ वा सुमारास कुर्डुवाडी बसस्थानकात घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी कि फिर्यादी या मुलीसोबत सुट्टीसाठी म्हणून कोल्हापूरला नातेवाइकांकडे गेल्या होत्या.तिथून परत आपल्या गावी बार्शी येथे जाण्यासाठी मिरजेहून सकाळी ६ वा. रेल्वेने निघून कुर्डुवाडी येथे १०.४५ वा पोहचल्या. त्यानंतर बार्शी येथे जाण्यासाठी बसस्थानकावर गाडीची वाट पाहात थांबल्या होत्या. दरम्यान मुलीने फिर्यादीला बाथरुमला जाऊन येते असे सांगून बसस्थानकातील शौचालयाच्या दिशेने गेली. बार्शी गाडी प्लॅटफॉर्मवर येऊन उभी राहिली तरी मुलगी काही आली नाही.त्यामुळे फिर्यादीने तिची शोधाशोध केली.नातेवाईकांकडे फोन करून विचारले, पण मुलगी काही मिळून आली नाही. त्यावरून फिर्यादीची खात्री झाली की कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञान कारणावरून मुलीला फूस लावून पळवून नेले आहे.



## डॉ.बा.ज. दाते प्रशालेत २५ वर्षांनी भेटले जुने वर्गमित्र

**सुराज्य/नातेपुते**

नातेपुतेमधील डॉ.बाळकृष्ण जयवंत दाते प्रशाला व नातेपुते कनिष्ठ महाविद्यालय नातेपुते मधील सन १९९८-९९ च्या इ. अकरावी बारावी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी २५ वर्षांनी विविध शहरातून सर्व जुने वर्गमित्र -मैत्रिणी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी प्रशालेच्या प्रांगणामध्ये एकत्र आले होते कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली यावेळी प्राचार्य एम.बी. होळ सर तसेच सी. एल. कुलकर्णी सर, डी.आर. कुलकर्णी सर ,मुख्याध्यापक व्ही .एस. पिसे सर, शिक्षकेतर कर्मचारी महावीर वसगडेकर उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपप्राचार्य होळ सर यांची श्री रवींद्र ननवरे यांच्या अनुमोदनाने निवड करण्यात आली कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष पवार तर मनोगत सोपान मोहिते,जहांगीर मुलाणी यांनी केले सर्व मान्यवरांचे आभार सचिन उराडे यांनी मानले तर सूत्रसंचालन सोमनाथ दडस यांनी केले उपस्थित सर्व गुरुवर्य यांना हार शाल श्रीफळ व श्री विठ्ठल मूर्ती देऊन सन्मान करण्यात आला हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जहांगीर मुलाणी, संतोष पवार, सचिन उराडे, रवींद्र ननवरे, सोमनाथ दडस, ज्ञानेश्वर जोरे, श्रीकांत कुचेकर, शशिकांत होडगे ,दीपक पिसे, ताराचंद चांगण, धनाजी खुसपे, त्याचबरोबर जगदेवी वाघ, अहिल्या पिसे, वैशाली सोरटे, सविता सोनवळ यांनी विशेष परिश्रम घेतले स्नेह मेळाव्यासाठी ४१ माजी वर्ग मित्र-मैत्रिणी उपस्थित होते.

## पाकणी येथे स्वतंत्र पोलीस चौकी करा : सरपंच यलगुंडे

**सुराज्य/उत्तर सोलापूर**



पाकनी ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या ऑइल, पेट्रोल कंपनीच्या सुरक्षेतेसाठी स्थानिक ग्रामस्थासाठी पाकनी येथे पोलीस चौकी करावी असे सरपंच बालाजी यलगुंडे ह्यांनी झालेल्या बैठकीत मागणी केली आहे.

गेल्या आठवड्यात ऑइल, पेट्रोल कंपनीचे व्यवस्थापक, सुरक्षा रक्षकांना पम्प्या टोळीने मारहाण करून जखमी केलं होते. त्यानिमित्ताने पाकनी ग्रामपंचायत, पाकनी येथील इंडियन, भारत व हिंदुस्तान पेट्रोल व ऑइल डेपोचे शाखा व्यवस्थापक यांच्यात सुरक्षा,गावकऱ्याचे विकास, स्थानिक रोजगार आदी विषयावर बैठक घेण्यात आली. सदरील बैठकीत सरपंच बालाजी येलगुंडे यानी पाकणी येथील ऑईल डेपोमध्ये डिझेल, पेट्रोल साठवून टँकरच्या माध्यमातून वहातूक केली जाते. सहा जिल्ह्याना इंधन पुरवठा केला जातो. पाकणी गावाची सुरक्षा महत्वाची आहे.

यावेळी भारत पेट्रोलियमचे लोकेश प्रसाद, उपसरपंच विजय शिंदे, ग्रा.प.सदस्य सौरभ शिंदे, ग्रा.प.किरण हजारे, ग्रा.प.सदस्य शरद चंदनशिवे, श्रीकांत येलगुंडे, दिनेश वाले, बाळू येलगुंडे उपस्थित होते. सुत्रसंचालन व आभार शरद चंदनशिवे यांनी मानले.

# श्रीनाथ विद्यालयात रंगला गुरु-शिष्य कृतज्ञता सोहळा

**सुराज्य/वेळापूर**

**श्रीनाथ विद्यालय व कै. विजयकुमार उर्फ बाबासाहेब शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय बोरगाव येथे इयत्ता १० वी सन १९९६-९७ मधील विद्यार्थ्यांचा रविवार दि. २८ मे २०२३ रोजी गुरु-शिष्य कृतज्ञता सोहळा (माजी विद्यार्थी स्नेहमेळावा) आयोजित केला होता.**



कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व गुरुवर्य व मान्यवर यांचे हलगीच्या गजरामध्ये फेटे बांधून व औक्षण करून स्वागत करण्यात आले. तद्नंतर विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. सभेच्या कार्यक्रमाच्या सुरुवातीला रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, लक्ष्मीबाई पाटील , कै. शंकरराव पाटील, कै. बाबासाहेब पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.त्यानंतर प्रशांत सरवदे यांनी स्वागत गीत सादर केले. महारुद्र कोळी यांनी गेट टुगेदर चा उद्देश सांगत आपले प्रास्ताविक सादर केले. तदनंतर सर्व गुरुजन व मान्यवर यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये चव्हाण एस. एस.भोसले बी.एम., लिंगे आर.जी. , चौगुले एल.आर., बागल एस. आर., कोरे एम. ई., यादव आर.टी., सौ. व श्री. होळीकर एस. व्ही., इंगळे जे.एन., रणदिवे व्ही. एम., तांबीले एच. ए., गाडे डी. जे.,घुले सी.जी., शिरकांडे.एम. आर., भीमराव साठे, सुबराव कोळी आदींचा हार, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी चव्हाण सर यांनी त्यांच्या पत्नींने लिहिलेली ५ पुस्तके विद्यालयास भेट दिली.

त्यानंतर इ. १० वी सन १९९६-९७ मधील सर्व विद्यार्थ्यांनी आपला परिचय करून दिला. विद्यार्थी मनोगतमध्ये डॉ. दिपाली पाटील, डॉ. राहुल शिरकांडे, भीमराव भुसणर, गीतांजली पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षक मनोगतामध्ये होळीकर एस. व्ही. व रणदिवे व्ही. एम. यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन राजकुमार पाटील यांनी आपल्या भाषणामधून सर्वांना विद्यालयातील विविध प्रकल्प व विकासयोजना यांची माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार ज्योती यादव यांनी मानले. सभेच्या कार्यक्रमानंतर सर्वांनी गोड जेवणाचा आस्वाद घेतला. जेवणानंतर प्रशांत सरवदे यांनी मैत्रीवर आधारीत गीते सादर केली व प्रवीण साठे यांनी बासरीवादन केले. कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कुमुदिनी पाटील, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य सुधीर कपडेकर, विद्यालयाचे प्राचार्य कांबळे के. टी., उपमुख्याध्यापक भुजबळ एम. एस. आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुशील पाटील, महारुद्र कोळी, विकास पाटील, संदीप सुतार, कुलकर्णी, अमोल पाटोळे, प्रशांत पवार, गजानन साळुंखे यांनी प्रयत्न केले.

# शेतकऱ्यांच्या खात्यावर ६ हजार जमा करणार

## ▶ १ रुपयात पीक विमा; राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय



✔ सुराज्य/मुंबई

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेली घोषणा पूर्ण करण्याच्या दिशेनं एक पाऊल पुढे टाकलं आहे. पंतप्रधान किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारनं नमो शेतकरी सन्मान योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. देवेंद्र फडणवीसांनी अर्थसंकल्प जाहीर करताना याबाबत घोषणा केली होती. मंगळवारी मंत्रिमंडळाने याला मान्यताही दिली आहे. नमो शेतकरी योजनेच्या माध्यमातून राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना एका वर्षात ६ हजार रुपये दिले जाणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना पीएम किसानप्रमाणे आता ६ हजार रुपये मिळतील.**

**एक रुपयात पीक विमा काढला जाणार**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना १ रुपयात पीक विमा देण्याची घोषणा केली होती. शेतकऱ्यांच्यावतीने पीक विम्याचा हप्ता राज्य सरकार भरणार आहे. या दोन्ही योजनांवर शेतकऱ्यांच्या काय प्रतिक्रिया येते ते पाहावं लागणार आहे. काही शेतकऱ्यांनी या योजनेचं स्वागत करण्यात आलं आहे. 'नमो शेतकरी महा सन्मान निधी योजनेचा' फायदा राज्यातील एक कोटी शेतकऱ्यांना होणार असून त्यांच्या खात्यावर अतिरिक्त सहा हजार रुपये जमा होणार आहेत.


नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये मिळणार असून शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा योजनेचाही लाभ घेता येणार आहे, असं फडणवीसांनी सांगितलं. शेतकऱ्यांसाठी ६ हजारांच्या निधीत आणखी ६ हजारांची भर टाकण्याचा निर्णय झालाय. त्यामुळे आता शेतकऱ्यांना वर्षाकाठी १२ हजार रुपये मिळणार आहेत. याचा फायदा १.१५ कोटी शेतकरी कुटुंबांना होणार आहे. यासाठी राज्य सरकारकडून ६ हजार ९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं.

### राज्य मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय (संक्षिप्त) -

▶ कामगारांची सुरक्षा, आरोग्य, कामाच्या स्थितीबाबत नवीन कामगार नियमांना मान्यता. लाखो कामगारांचे हित जपले. (कामगार विभाग) ▶ केवळ एक रुपयात पीक विमा योजनेचा लाभ देणार. लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा. (कृषी विभाग) ▶ नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राज्यात राबविणार. पीएम किसान योजनेची कार्यपद्धती सुधारणार. (कृषी विभाग) ▶ डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजनेस मुदतवाढ. योजना आणखी तीन जिल्ह्यातही राबविणार (कृषी विभाग) ▶ सिल्लोड तालुक्यात मका संशोधन केंद्र स्थापन करणार. २२.१८ कोटी खर्चास मान्यता (कृषी विभाग) ▶ महिलांना पर्यटन व्यवसायात अधिक वाव देण्यासाठी महिला केंद्रीत पर्यटन धोरण (पर्यटन विभाग) ▶ राज्याला माहिती तंत्रज्ञानात देशात आघाडीवर नेणाऱ्या नवीन माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरणास मान्यता. ९५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करणार (उद्योग विभाग) ▶ कापूस उत्पादक क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्यासाठी नव्या वस्त्रोद्योग धोरणास मान्यता. २५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करणार (वस्त्रोद्योग विभाग) ▶ सहकारी संस्थांचे कामकाज परिणामकारक व्हावे म्हणून क्रियाशील सदस्यांची व्याख्या स्पष्ट. अधिनियमात सुधारणा करणार (सहकार विभाग) ▶ बृहन्मुंबईमध्ये समूह पुनर्विकासास मोठे प्रोत्साहन मिळणार. अधिमूल्यात ५० टक्के सवलतीचा निर्णय (नगरविकास विभाग) ▶ अभियांत्रिकी, औषधनिर्माण महाविद्यालयांत प्राध्यापकांची १०५ पदांची निर्मिती करणार (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) ▶ नांदुरा येथील जिगाव प्रकल्पाला गती देणार. अतिरिक्त १७१० कोटींच्या खर्चास मान्यता (जलसंपदा विभाग) ▶ नमो शेतकरी महा सन्मान निधी योजना जाहीर. शेतकऱ्यांसाठी ६ हजारांच्या निधीत आणखी ६ हजारांची भर. शेतकऱ्यांना वर्षाकाठी १२ हजार रुपये मिळणार. राज्य सरकारकडून ६ हजार ९०० कोटी रुपयांची तरतूद.

---

## पुणे लोकसभा पोटनिवडणुकीत धंगेकर की मोहन जोशी?



✔ सुराज्य/पुणे

पुण्याचे दिवंगत खासदार गिरीश बापट यांचं निधन झाल्यानंतर पुण्याची लोकसभेची जागा रिक्त झाल्या असून लवकरच या जागेवर पोटनिवडणूक लागण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाची तयारी देखील अंतिम टप्प्यात आली आहे. त्यामुळे आता भाजपसहित सर्वच पक्षांनी या पोटनिवडणुकीची तयारी सुरू केल्याचे पाहायला मिळत आहे. एकीकडे महाविकास आघाडीत ही जागा काँग्रेस लढणार की राष्ट्रवादी काँग्रेस यावरून संघर्ष सुरू असताना काँग्रेसमध्येदेखील उमेदवारीसाठी रस्सीखेच पाहायला मिळत आहे.

काँग्रेस पक्षातून शहराध्यक्ष अरविंद शिंदे, मोहन जोशी आणि आमदार रवींद्र धंगेकर यांची नावे चर्चेत आहेत. तर लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठी रवींद्र धंगेकर यांना तयारी करण्याचे आदेश दिल्याची बातमी समोर आली होती मात्र या बातमीच स्वतः रवींद्र धंगेकर यांनी खंडन केल आहे.' मला पक्षाकडून कोणताही आदेश आलेला नाही. मी आता कुठे आमदार झालोय ही पोट निवडणूक आहे हा काळ छोटा आहे.

२०१९ साली मोहन जोशी यांनी निवडणूक लढवली होती. त्यामुळे पक्ष त्यांचाच विचार करेल असं मला वाटतं. कारण यापूर्वी त्यांनी पुण्याच्या दोन लोकसभेच्या निवडणुकी लढवल्या आहेत त्याचा त्यांना अनुभव आहे. त्या निवडणुकात देखील त्यांनी चांगली मत घेतली होती आणि आता तर वारं बदलल आहे.

मी अजून आमदार आहे पक्षात छोटा कार्यकर्ता आहे. मोहन दादांच्या वयात जायला मला अजून दहा वर्षे बाकी आहेत, त्यामुळे मी पहिल्या दिवसापासून ही निवडणूक लढायला इच्छुक नाही. नंतर पक्ष कधी संधी देईल तेव्हा मी आहेच.' असं रवींद्र धंगेकर म्हणाले आहेत.

## कुरुलकरांना दणका; न्यायालयीन कोठडीत वाढ

✔ सुराज्य/पुणे

दिघी येथील संशोधन आणि विकास संस्थेचे (आर अँड डीई) संचालक आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप कुरुलकर यांच्या न्यायालयीन कोठडीत १२ जूनपर्यंत वाढ करण्यात आली आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. नावंदर यांनी डॉ. कुरुलकर यांना कोठडी सुनावली.



डॉ. कुरुलकर यांनी पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या (पीआयओ) महिला हस्तकांना काही संवेदनशील माहिती आणि छायाचित्रे पाठविल्याच्या संशयातून त्यांच्याविरोधात 'डीआरडीओ'च्या दक्षता आणि सुरक्षा विभागाचे संचालक कर्नल प्रदीप राणा यांनी तक्रार केली होती. त्यावरून 'एटीएस'ने कुरुलकर यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक केली. डॉ. कुरुलकर यांना १४ दिवसांच्या पोलीस कोठडीनंतर न्यायालयीन कोठडी सुनावली होती. त्याची मुदत सोमवारी (२९ मे) संपली. त्यामुळे सोमवारी पुन्हा या प्रकरणी सुनावणी झाली. या गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांची चौकशी सुरू असल्याची माहिती 'एटीएस'च्या अधिकाऱ्यांनी दिली. तसेच, 'एटीएस'ने तपासाबाबतचा अहवाल न्यायालयात सादर केला.

## प्राध्यापक भरतीसाठी प्रस्तावच नाही

✔ सुराज्य/पुणे

उच्च शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या खासगी अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक भरतीला मान्यता देण्यात आली आहे. मात्र एकीकडे राज्यातील महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याची, पदभरती होत नसल्याची ओरड केली जात असताना प्राध्यापक भरतीसाठी १०९ महाविद्यालयांनी ५३२ पदांच्या भरतीसाठी ना हरकत प्रमाणपत्रासाठीचा मागणी प्रस्ताव उच्च शिक्षण संचालनालयाकडे सादर केला नसल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित महाविद्यालयांनी येत्या १५ जूनपर्यंत ऑनलाइन प्रस्ताव सादर न केल्यास ती पदे अन्य महाविद्यालयांना वर्ग करण्याबाबत शासनाला प्रस्तावित करण्याचा इशारा उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिला.

## खासदार बाळू धानोरकर यांचे निधन

### दिल्लीत घेतला अखेरचा श्वास

✔ सुराज्य/पुणे

गेल्या काही दिवसांपासून रुग्णालयात उपचार घेत असलेले काँग्रेसचे खासदार सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांची प्राणज्योत मालवली आहे. दिल्लीतील मेदांता रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला असून एअर ॲम्ब्युलन्सद्वारे त्यांचं पार्थिव त्यांच्या निवासस्थानी आणण्यात येईल.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी विषयींची माहिती देत त्यांना आदरांजली वाहिली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी वरोराच्या आमदार प्रतिभा धानोरकर, दोन मुले, आई, भाऊ भद्रावतीचे नगराध्यक्ष अनिल धानोरकर, बहीण व बराच मोठा आप्त परिवार आहे.



बाळू धानोरकर हे चंद्रपूरचे काँग्रेसचे खासदार होते. काँग्रेसचे राज्यातील ते एकमेव खासदार होते. काही दिवसांपासून बाळू धानोरकर आजारी होते. नागपुरात खासगी रुग्णालयात त्यांच्यावर किडनी स्टोन शस्त्रक्रियाही झाली. शस्त्रक्रियेदरम्यान गुंतागुंत वाढल्याने २८ मे रोजी त्यांची प्रकृती बिघडली. त्यामुळे एअर ॲम्ब्युलन्सद्वारे त्यांना नागपूरहून दिल्लीत उपचारांसाठी हलवण्यात आले. दिल्लीत त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आलं होतं. अखेर, मंगळवारी पहाटेच उपचारा दरम्यान त्यांचं निधन झालं. मृत्यूसमयी त्यांचं वय ४७ होते. खासदार बाळू धानोरकर यांचे पार्थिव वरोरा येथील निवासस्थानी दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत अंतिम दर्शनाकरिता ठेवण्यात येणार आहे. अंतिम संस्कार वरोरा येथील वणी बायपास स्मशानभूमी येथे होईल. काही महिन्यांपूर्वी त्यांनी नवी कार खरेदी केली होती. भद्रावती येथे जात असताना त्यांच्या कारला अपघात झाला. या अपघातात त्यांच्या पोटाला व कंबरेच्या भागाला गंभीर दुखापत झाली.

मात्र, या दुखापतीकडे त्यांनी दुर्लक्ष केले. पोटदुखी वाढल्यानंतर नागपुरात अरिहंत रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू झाले. या अपघातात स्वादुपिंडाला जबर दुखापत झाली. तीच पुढे गंभीर होत गेली.

### ▶ नंदुरबार पोलिसांची बालविवाहविरोधात साद

# ऑपरेशन अक्षताला ६३१ गावांची साथ

✔ सुराज्य/नंदुरबार

**राज्यात बालविवाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक ठिकाणी बालविवाहाच्या घटना घडत आहेत. काही ठिकाणी प्रशासनाकडून बालविवाहाच्या घटना रोखण्यात आल्या आहेत. नंदुरबार या आदिवासी बहुल जिल्ह्यातील ग्रामपंचायती आणि गावकरी बालविवाहाविरोधात एकत्र आले आहेत. नंदुरबार पोलिसांच्या आवाहनाला साथ देत ६३१ ग्रामपंचायतींनी बालविवाह विरोधी मोहिमेला पाठिंबा दर्शवला आहे. ६३१ ग्रामपंचायतींनी याबाबत ठराव केले आहेत. या गावातील सरपंचांनी त्यांच्या गावामध्ये बालविवाह होऊ देणार नाही, असं म्हणत पोलीस यंत्रणेला पाठिंबा दिला आहे.**

---

नंदुरबार जिल्हा प्रशासनानं ८ मार्चपासून जिल्हा पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील यांच्या संकल्पनेतून ऑपरेशन अक्षता सुरु केलं होतं. नंदुरबार जिल्हा पोलीस दलाकडून राबविण्यात येणाऱ्या ऑपरेशन अक्षताचे नंदुरबार पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच ऑपरेशन अक्षता हा उपक्रम यानंतर देखील नंदुरबार जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येईल. त्यामुळे जिल्ह्यातील बालविवाहाच्या समस्येचे समूळ उच्चाटन करण्यात यश येईल, अशी माहिती पी. आर. पाटील यांनी दिली.

### १९ बालविवाह रोखले

नंदुरबार जिल्ह्यातील ६३४ ग्रामपंचायतींपैकी ६३१ ग्रामपंचायतींमध्ये बालविवाह विरोधी ठराव मंजूर करण्यात आले आहेत, तसेच उर्वरीत ०३ ग्रामपंचायतींचे ठराव देखील लवकरच घेण्यात येतील. त्याचप्रमाणे आज पावेतो नंदुरबार जिल्हा पोलिसांनी १९ बालविवाह रोखले आहेत.

ऑपरेशन अक्षता या उपक्रमांतर्गत पोलीस ठाणे स्तरावरील अक्षता सेलच्या सदस्य असलेले गाव पातळीवरील महत्वाचा घटक म्हणजे पोलीस पाटील यांची ऑपरेशन अक्षता हा उपक्रम सुरु झाल्यापासून दर मंगळवारी बैठक घेण्यात येत असते.

नंदुरबार जिल्ह्यातील पोलीस पाटील यांच्या आतापर्यंत १२० बैठका घेण्यात आलेल्या आहेत. तसेच पुढील काळात पोलीस ठाणे येथे घेण्यात येणाऱ्या प्रत्येक मंगळवारच्या बैठकीत स्तरावरील अक्षता सेलचे सदस्य असलेले ग्रामपंचायत, ग्रामसेवक, पोलीस पाटील, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका व बीट अंमलदार यांच्या देखील बैठका घेण्यात येणार आहेत.

कोलदा गावातील रहिवासी नंदा गावित यांनी पोलिसांनी आम्हाला बालविवाहासंदर्भात नागरिकांकडून होणाऱ्या चुका सांगितल्या, आम्हाला त्याच्या परिणामाची जाणीव करुन दिली त्यामुळं आमच्या गावात बालविवाह होऊ देणार नाही, असं नंदा गावित म्हणाल्या.




### बालविवाहाचा प्रश्न गंभीर

राज्यात बालविवाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. कोरोना संसर्गाच्या काळापासून बालविवाहाची संख्या वाढलेली आहे. विविध जिल्ह्यातील जिल्हा बाल संरक्षण, पोलीस प्रशासन, गावपातळीवरील प्रशासकिय यंत्रणा आणि सरपंचांच्या सहाय्यानं बालविवाहाचे प्रयत्न रोखण्यात येत आहेत. नंदुरबारच्या जिल्हा परिषदेच्या एका अधिकाऱ्यानं नाव नं जाहीर करण्याच्या अटीवर ५ टक्के मुली १८ वय पूर्ण नसताना पहिल्या मुलाला जन्म देतात, अशी माहिती दिली. आदिवासी विभागाच्या २०१९-२० आणि २०२१-२२ दरम्यान १५ टक्के मुलींची लग्न १८ पेक्षा वय कमी असताना झाल्याचं म्हटलंय.

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त

### सहाय्यक पोलीस निरीक्षकाचा आत्महत्येचा प्रयत्न

✔ **मुंबई** : वरिष्ठ अधिकाऱ्याच्या जाचाला कंटाळून घाटकोपर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका सहाय्यक पोलीस निरीक्षकाने पोलीस ठाण्यातच आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना सोमवारी रात्री घडली. या अधिकाऱ्यावर सध्या एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गेल्या दीड वर्षांपासून घाटकोपर पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत असलेले बाळकृष्ण नानेकर यांची काही दिवसांपूर्वी पुणे येथे बदली झाली होती. त्यामुळे त्यांनी पुणे येथे कुटुंबियांसह राहण्याचा निर्णय घेतला. पण वरिष्ठांकडून तशी परवानगी मिळत नव्हती. याच कारणामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले.

### सिगारेटला ३० रुपये न दिल्याने आईला मारहाण

✔ **पुणे** : सिगारेट घेण्यासाठी आईने २० रुपये न दिल्याने आईला मारहाण करणाऱ्या मुलाच्या विरुद्ध कोंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या प्रकरणी माधव राजाराम कांबळे (वय २७) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत सखुबाई राजाराम कांबळे (वय ४५, रा. कोंढवा खुर्द) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माधव काही कामधंदा करत नाही. त्याने आई सखुबाई यांच्याकडे सिगारेटसाठी २० रुपये मागितले. त्यांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यावेळी त्याची भावाशी वादावादी झाली. सखुबाई यांनी भांडणात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. माधवने आईच्या हातावर बांबू मारला. मारहाणीत आईचा हात फ्रॅक्चर झाला.

### वंदेभारत 'फुल्ल' आणि उत्पन्न 'हाफ'

✔ **पुणे** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन वंदे भारत एक्सप्रेस गाड्या सुरू करण्याचा धडाका लावला आहे. देशभरात सध्या एकूण १८ वंदे भारत सुरू आहेत. यातील मुंबई ते सोलापूर वंदे भारतला सर्वाधिक प्रवासी असल्याचा दावा मध्य रेल्वेने केला आहे. मात्र, प्रवासी संख्या जास्त असूनही या गाडीचे उत्पन्न सुमारे ५० टक्केच असल्याची बाब समोर आली आहे.

### ऑनलाईन खेळातून नोकरदाराची फसवणूक

✔ **डोंबिवली** : ऑनलाइन खेळांच्या माध्यमातून भामट्यांनी डोंबिवलीतील गोळवली गावातील एक नोकरदार आणि इतरांच्या बँक खात्यांचा वापर करून दोन जणांनी लाखो रुपयांची फसवणूक केली. ऑनलाइन खेळाच्या माध्यमातून डोंबिवली, कल्याण शहर परिसरातील अनेकांची फसवणूक होण्याचे प्रमाण वाढल्याने पोलीस चक्रावून गेले आहेत. धीरेश रघुनाथ पाटील (४०, रा. गोळवली) असे तक्रारदाराचे नाव आहे. चांदणी सिंह, मोहीत लालवाणी (रा. रोहानी सत्संग, खेमाणी रोड, उल्हासनगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

### जेएनपीए बनणार देशातील पहिले स्मार्ट बंदर

✔ **उरण** : २६ मे १९८९ ला सुरू झालेल्या न्हावा-शेवा आणि सध्याच्या जेएनपीए ने ३४ व्या वर्षात पदार्पण केले असून, येत्या दोन महिन्यांत देशातील पहिले स्मार्ट बंदर होणार आहे. त्याचप्रमाणे हरित बंदराकडे वाटचाल सुरू असल्याची माहिती केंद्रीय बंदर, जलवाहतूक मंत्री सरबानंद सोनोवाल यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. उत्कृष्ट कामगिरीबद्दल जागतिक बँकेने जेएनपीएला जगातील अव्वल परफॉर्मर म्हणून स्थान दिले आहे. तर अत्याधुनिक पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, कार्यक्षमता यामुळे जेएनपीए बंदर ३४ वर्षांपासून ग्राहकांच्या समाधानासाठी अतूट वचनबद्धतेसह जेएनपीए सागरी उद्योगात उत्कृष्टतेचे प्रतिक म्हणून उदयास आले आहे.

### दागिने घेऊन वधू फरार

✔ **नाशिक** : सध्या ग्रामीण भागात लग्नासाठी मुलगी मिळणे अवघड झाल्याचा गैरफायदा काही समाजकंटक घेऊ लागले असून लग्न लावून देण्याचे आश्वासन देत पैसे घेऊन मुलाकडील मंडळींना लुबाडण्याचे उद्योग सुरु झाले आहेत. अशाच एका प्रकरणात जायखेडा पोलीस ठाण्यात संशयित युवतीसह तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सटाणा तालुक्यातील उत्राणे येथील पराग पगार (२१) या युवकाशी एका महिलेसह विजय मुळे (रा. देऊळगाव) आणि अजून एका व्यक्तीने लग्नासंदर्भात संपर्क साधला.

### सैन्यदलातील जवान १३ वर्षांपासून बेपत्ता

✔ **छ. संभाजीनगर** : जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातल्या माळेगाव पिंप्री येथील रवींद्र भागवत पाटील हा ३२ वर्षीय जवान (६४९८१६७-थ) जम्मू काश्मीरमध्ये कर्तव्यावर असतानापासून बेपत्ता झाला आहे. त्याला १३ वर्षे झाली असून त्याचा शोध घेण्यासाठी सैन्य दलाचे आणि प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या दालनाचे उंबरठे झिजवून उपयोग होत नसल्याचा आरोप करत जवान रवींद्र पाटील यांचे आई-वडील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला बसले आहेत. त्यांच्यासोबत जवान रवींद्र यांचे मोठे बंधू संतोष व नातेवाईक असलेले सैनिक चंदू चव्हाणही आहेत.

### बाहेरुन कडी लावून शिक्षणाधिकाऱ्यांचे कामकाज

✔ **नाशिक** : जिल्हा परिषदेत प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांचा सोमवारी (दि.२९) दुपारी ५ ते ६ च्या दरम्यान बाहेरुन कडी लावून आतमध्ये कारभार सुरु असल्याने अभ्यागतांना रिकाम्या हातानेच परतावे लागले. भेटीसाठी अभ्यागत ताटकळत उभे असतांना बाहेरील महिला कर्मचाऱ्यांनी साहेबांची महत्वाची मिटींग सुरु असल्याने बाहेरुन कडी लावण्याचे निर्देश दिले असल्याचे सांगितले. यामुळे नाराज अभ्यागतांना परतावे लागले.

### गोळीबार करणाऱ्या टोळीवर मोक्का

✔ **नाशिक** : शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी शहर पोलिसांनी सराईत गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाईला सुरुवात केली आहे. त्या अंतर्गत पंचवटी आणि उपनगर परिसरात दहशत माजविणाऱ्या विशाल भालेराव याच्या टोळीतील चार जणांवर मोक्कांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या टोळीतील सदस्यांविरोधात पंचवटी व उपनगर पोलीस ठाण्यात ११ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. मार्चमध्ये या टोळक्याने गावठी बंदूक व कोयत्याने एकावर प्राणघातक हल्ला केला होता.

### भरती परीक्षेत बनावट विद्यार्थी

✔ **नाशिक** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या भरती परीक्षेत बनावट विद्यार्थी पेपर देताना आढळून आला. संबंधिताकडून प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा वापर केला जात होता. छाननीत ही बाब उघड झाली. या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील तीन जणांविरुध्द येथील उपनगर पोलीस ठाण्यात फसवणुकीसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नाना मोरे (सदगुरूनगर, पुणे) यांनी तक्रार दिली.

### लाच स्वीकारताना रंगेहात पकडले

✔ **कोल्हापूर** : सेवानिवृत्ती रजा मंजूर करण्यासाठी २५ हजार रुपये बाकीची रक्कम स्वीकारल्याप्रकरणी आरोग्य विभागातील सहा. अधीक्षकासह तियांना रंगेहाथ करण्यात आले. मारुती परशुराम वरुटे (वय- ५० वर्षे, सहायक अधीक्षक, उपसंचालक कार्यालय, रा. पोतदार हायस्कूल जवळ मूळ रा. कासारपुतळे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर) व विलास जिवनराव शिंदे, (वय - ५७ वर्षे, चालक ग्रामीण रुग्णालय पारगाव, ता. हातकणंगले), शिवम विलास शिंदे, (वय - २२ वर्षे, रा. सरकारी हॉस्पिटल कॉलनी पारगाव, ता. हातकणंगले मुळ रा. किणी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) अशी या संशयित आरोपींची नावे आहेत.

# वयाच्या साठीपूर्वीच राज्यातील सहा लोकप्रतिनिधींची झाली एक्झिट

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील काँग्रेसचे एकमेव खासदार बाळू धानोरकर यांच्या निधनाने सहावा लोकप्रतिनिधी आपल्यातून निघून गेला आहे. यंदाची टर्म महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींना फारशी चांगली राहिली नाही. महाराष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या अनेक खासदार आणि आमदारांचे या टर्ममध्ये निधन झाले. परिणामी एका खासदार किंवा आमदाराचे निधन होणे हे सर्व राजकीय पक्षांसाठी धक्कादायक आहे. लाखो मतांनी निवडून आलेली नेतेमंडळी पक्षाचा सहवास सोडून जातात. त्यामुळे पक्ष आणि कार्यकर्ते पोरके होवून जातात. आतापर्यंत सहा लोकप्रतिनिधींची वयाच्या साठी पूर्वीच अकाली एक्झिट झाली आहे.**

बाळू धानोरकर यांचे वय ४७ होते. त्यांचा जन्म ४ मे १९७५ रोजी यवतमाळमध्ये झाला. त्यांनी कला आणि कृषी शाखेचे शिक्षण घेतले होते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कपड्यांचे दुकान सुरु केले. वाहन खरेदीसाठी कर्जपुरवठा करणारी कंपनी चालवली. सुरूवातीला ते चंद्रपुरातील वरोरा विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचे आमदार होते. त्यानंतर त्यांनी शिवसेनेला रामराम ठोकत काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

### भाजपा आमदार मुक्ता टिळक



पुण्यातील कसबा मतदारसंघाच्या भाजपच्या आमदार तथा पुण्याच्या माजी महापौर मुक्ता टिळक ह्याही दीर्घ आजाराने अकाली वारल्या. त्या ५७ वर्षांच्या होत्या. त्या चारवेळा नगरसेविका होत्या. सदाशिव-नारायण पेठेतील प्रभाग क्रमांक १५ च्या त्या नगरसेविका म्हणून नेतृत्त्व करत होत्या.मुक्ता टिळक यांनी २०१७ ते २०१९ या काळात पुण्याचे महापौरपद भूषवले होते.

### भाजपा खासदार गिरीश बापट



भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि पुण्यातील कसबा पेठ मतदारसंघातील खासदार गिरीश बापट यांची कसबा पेठेतील किंगमेकर अशी ओळख होती. दीर्घकाळापासून आजारी असतानाही त्यांनी आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या कसबा पेठ पोटनिवडणुकीच्या प्रचारसभेत सहभाग घेतला होता. नाकात नळी, बोटाला ऑक्सिमीटर लावून भाषण करीत त्यांनी कार्यकर्त्यांचा हुरूप वाढवला होता.

### शिवसेना आमदार रमेश लटके



अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघातील विद्यमान शिवसेना आमदार रमेश लटके यांचे ह्दयविकाराने निधन झाले. १९९७ साली प्रथम मुंबई महानगरपालिकेवर नगरसेवक म्हणून ते निवडून गेले. अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार होते. सलग दोन टर्म रमेश लटके हे शिवसेनेचे आमदार राहिले होते.

### काँग्रेस आमदार चंद्रकांत जाधव




कोल्हापूर उत्तरचे काँग्रेसचे आमदार चंद्रकांत जाधव यांच्या जाण्याने उद्योग क्षेत्राची हानी झाली. कोल्हापूरचे एक यशस्वी उद्योजक, उत्कृष्ट फुटबॉलपटू, अभ्यासू राजकीय नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. पाच वर्षे त्यांनी भाजपमध्ये काम केले. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

### काँग्रेस खासदार राजीव सातव



काँग्रेस खासदार राजीव सातव यांनी सन २००२ मध्ये मसोड पंचायत समिती गणातून निवडणूक लढवली. जिल्हा परिषदेत त्यांना कृषी सभापतीपद मिळाले. यापदावर काम करतांना त्यांनी शेतीत नवीन प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषीरत्न पुरस्कार देण्यास सुरवात केली. युवक २००९ मध्ये त्यांनी कळमनुरी विधानसभेचे आमदार झाले. हिंगोली मतदार संघातून सन २०१४ मध्ये मोदी लाटेमध्ये ते विजयी झाले.

### काँग्रेस आमदार रावसाहेब अंतापूरकर



नांदेडमधील देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस आमदार रावसाहेब अंतापूरकर यांचे कोरोनाने निधन झाले. ते ५५ वर्षांचे होते. सामान्यांचा आणि तळागाळात जाऊन काम करणारा नेता म्हणून रावसाहेब अंतापूरकर यांची ओळख होती.त्यांनी नोकरीला रामराम ठोकला. त्यानंतर रावसाहेब अंतापूरकर यांनी देगलुर-बिलोली मतदारसंघातून निवडणूक लढवली. यामध्ये त्यांनी बाजी मारली.

### राष्ट्रवादीचे आमदार भारत भालके



राष्ट्रवादीचे काँग्रेसचे पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार भारत भालके यांचे साठाव्या वर्षी कोरोनामुळे निधन झाले. ते पश्चिम महाराष्ट्रातील मातब्बर नेत्यांपैकी एक होते. १९९२ साली ते तालुका स्तरावरील राजकारणात सक्रिय झाले. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून त्यांनी कारकिर्दीला सुरुवात केली. २००२ पासून त्यांना या कारखान्याच्या अध्यक्षपदावर कायम वर्चस्व ठेवले होते. सलग तिसऱ्यांदा विधानसभा निवडणुकीत विजय मिळवून आमदार झाले होते.

## पक्षप्रवेशाची लाडीगुलाबी..!

आगामी काळात लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजणार आहे. त्यामुळे विविध राजकीय पक्षांमध्ये नेते आणि कार्यकर्ते यांना खेचाखेची करण्याचा खेळ चांगलाच रंगणार आहे. एव्हाना गेल्या वर्षभरांपासून तो रंगत आहेच. पक्षातील नेत्यांवर नाराजीचे खापर फोडून इतर पक्षात जाऊन आपले बस्तान बसविण्याचा अनेकांचे नेटाचे प्रयत्न सुरु आहेत. असाच काहीसा प्रकार सोलापूर शहर-जिल्ह्याच्या राजकारणात सुरु आहे. यासाठी 'लाडीगुलाबी' करुन निवडणुतील तिकीटाचे आश्वासन, वेगवेगळी अमिषे, पक्षातील पदे याचे गाजर दाखवले जात आहे.

मध्यतंरी झालेल्या काँग्रेसच्या निर्धार मेळाव्यात शहर भाजपाला वाहिलेले आणि त्यात तावून सुलाखून निघालेले भाजपाचे माजी शहराध्यक्ष प्रा. अशोक निंबर्गी यांनी कुणाच्या ध्यानमूनी नसताना 'कमळ' सोडून काँग्रेसचा 'हात' हातात घेतला. खरंतर शहर भाजपातील खाचाखुचा माहिती असलेले प्रा. निंबर्गी यांच्या प्रवेशाने कॉंगेसमधील मंडळी जाम खूष झाली. जणू काही मरगळलेल्या काँग्रेसला प्रा. अशोक निंबर्गी यांच्यामुळे उभारी आली की काय?, अशा थाटातच काँग्रेसचे स्थानिक नेते वावरत फिरु लागली आहेत. लागलीच प्रा. निंबर्गी यांना शहराचे प्रवक्तेपद देऊन त्यांना प्रवेशाची बक्षिसी दिली गेली. पण या सर्व प्रकारात प्रा. निंबर्गी यांनी आमदार




शंकर जाधव, कार्यकारी संपादक
मो.९५१८७७३०४८

विजयकुमार देशमुख यांची दुश्मनी अंगावर ओढून घेतली आहे. एकेकाळी एका ताटात जेवणारे आणि गळ्यात गळे घालून फिरणारे 'सर आणि मालक' यांच्यात कशामुळे बिनसले यांचा 'अर्थ' मात्र कुणालाच लागेना. यात भाजपचे स्थानिक नेते आणि कार्यकर्ते मात्र गप्पच आहे. प्रा. निंबर्गी ज्या दिवशी काँग्रेसमध्ये गेल्या तेव्हाच भाजपने आपल्या डायरीतून प्रा. निंबर्गी यांच्या नावावर खाट मारुन त्यांच्या नावाच्या चर्चेला पूर्णविराम दिला आहे. असे असले तरी प्रा. निंबर्गी हे गप्प बसणारे नाहीत. हे सर्वांनाच माहिती आहे. येणाऱ्या महापालिका निवडणुकीची काँग्रेसची सूत्रे प्रा. निंबर्गी यांनाच दिली जातील, असे संकेत आहेत. त्यादृष्टीने सरांची वाटचाल सुरु आहे. हे करताना भाजपातील काही मोहरे जे की मालकाविरोधी आहेत. त्यांना आपल्या गळाला लावण्याचा प्रयत्न सरांनी सुरु केला आहे. त्यात त्यांचा पहिला मोहरा माजी नगरसेवक सुरेश पाटील असणार आहे. त्यानंतर पाहू या प्रा. निंबर्गी भाजपाला कशा पध्दतीने 'धक्के' देणार आहेत.

काँग्रेसने प्रा. निंबर्गी यांना पावन करुन भाजपाला जसा धक्का दिला आहे. तसाच काही माजी नगरसेवक आणि कार्यकर्त्यांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश देऊन जशास तसे उत्तर दिले आहे. खरंतर हा प्रवेश भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्याचा बेत शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांनी घातला होता. पण त्यावेळी आ. विजयकुमार देशमुख यांनी नको...नको... म्हणत फडणवीस यांच्याच हस्ते करण्याचा घाट घातला होता. तसे आ. देशमुख यांच्या मनाप्रमाणे झालेही. पण यात आ. देशमुख यांनी विनकारण विक्रम देशमुख यांना नाराज करुन आणखी एक दुश्मन वाढवून घेतला आहे. खरंतर शहराध्यक्ष झाल्यापासून विक्रम देशमुख यांनी एकमेकांच्या विरुध्द दिशेला तोंडे असणारे आ. विजयकुमार देशमुख आणि आ. सुभाष देशमुख यांना एकत्र आणून त्यांच्यातील कटुता संपविण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण त्याला अद्यापही यश आले नाही. त्यातच भाजपा शहराध्यक्ष निवडीच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. आ. विजयकुमार देशमुख हे विक्रम देशमुख यांना हटवून आपल्या खास मर्जीतील पूर्व भागातील एका माजी नगरसेवकांची अध्यक्षपदी वर्णी लावण्याच्या तयारीत आहेत. पाहू या, निवडणुकांच्या तोंडावर भाजपात पेरलेले कशा पध्दतीने उगवणार आहे. आणि हे उगवलेले कसे फोफवणार आहे.

## आजारी शिवसैनिकास मुख्यमंत्र्यांचा लाखमोलाचा आधार

सुराज्य/सोलापूर

निराळे वस्ती भागात राहणारे एसटी कामगार सेनेचे माजी सचिव अरूण कामतकर हे गेल्या दोन वर्षापासून मणक्याच्या आजारानं ग्रस्त आहेत. याबाबतचं वृत्त सोशल मिडियावर व्हायरल होताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तात्काळ उपचारासाठी रोख एक लाखांची मदत दिली. ही मदत शिवसेनेचे (एकनाथ शिंदे गट) जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी त्यांना पोहोचविली.



औषधोपचारासाठी आर्थिक चणचण आहे, मदतीला कोणी येईना ही बातमी कळताच रात्री ११ च्या सुमारास फोनाफोनी सुरु झाल्यानंतर अमोल शिंदे स्वतः कामतकर यांच्या निवासस्थानी पोहचले आणि ही मदत दिली. याचवेळी एकनाथ शिंदे आणि कामकतकर यांच्यात व्हिडीओ फोन द्वारे संवादही साधून दिला. कामतकर गेली दोन वर्ष मणक्याच्या विकारानं ग्रस्त आहेत. त्यांना सध्या औषधोपचारासाठी आर्थिक गरज आहे. आपण अनेक लोकप्रतिनिधींना तात्पूर्ती मदत मागितली, बरं झाल्यानंतर पैसे परत देतो असे सांगितले. पण आश्वासनाखेरीज काही मिळालं नाही. मात्र आपण देवाप्रमाणे धावून आलात असं सांगत मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. अमोल शिंदे यांनी आपण बरे होईलपर्यंत आपल्या मदतीस असतील असे कामतकर यांना सांगितले.

## संघर्षाची मशाल हाती : आडम मास्तरांच्या आत्मचरित्र प्रकाशन सोहळ्याची जय्यत तयारी!

सुराज्य/सोलापूर

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या सर्वोच्च समितीचे सदस्य आणि महाराष्ट्र राज्य सचिव पद यशस्वीपणे भूषविलेले माजी आमदार कॉ.नरसय्या आडम या स्फूर्तीदायी व्यक्तिमत्वाचा आत्मचरित्र प्रकाशन सोहळा गुरुवार १ जून रोजी नॉर्थकोट मैदान येथे संपन्न होणार आहे.

या सोहळ्याची जंगी आणि जय्यत तयारी करण्यात येत आहे. या सोहळ्याला समस्त सोलापूरकरांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव ॲड.एम. एच.शेख यांनी केले. माजी आमदार कॉ.नरसय्या आडम यांनी अनेक लढे यशस्वी केले. संघटीत-असंघटीत कामगार कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना घेऊन सरकारची सरकारचे लक्ष वेधले. न्याय हक्काची लढाई व धनशक्ती विरुद्ध श्रमशक्ती मजबुत करण्यासाठी अव्याहतपणे परिश्रम घेत आहेत. ही बाब चळवळीत येणाऱ्या नवोदित




कार्यकर्त्यांसाठी स्फूर्ती आहे. दरम्यान, आत्मचरित्र प्रकाशन सोहळ्याची जय्यत तयारी करत असून शहरात ठिकठिकाणी लाल झेंडे, स्वागत कमानी, डिजीटल फलक लावण्यात येत आहेत. गेल्या महिनाभरापासून सोशल मीडियावर कॉ. आडम यांनी आजवर केलेली आंदोलने, लढे, मोर्चा, कार्याची माहिती देणारे पोस्ट टाकण्याचे उपक्रम चालू आहे.यामध्ये फेसबुक, व्हाट्सएप, ट्विटर, इंस्टाग्राम हँडल चालवत आहेत. तसेच प्रसार आणि प्रचारासाठी १लाख पत्रके छपाई केली असून त्याच्या वितरणासाठी संपूर्ण शहरात पक्षाच्या नेतृत्वाखाली गटसभा, कॉर्नर सभा, ऑटो रिक्षा प्रचार, निमंत्रण पत्रिका वितरित करण्यात येत आहेत.

या सभेला किमान ५० हजार लोक येतील अशी शक्यता आहे. तसेच राज्यातील विविध जिल्ह्यातील कार्यकर्ते व नेतेगण ही या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाची सुमारे १ लाख पत्रके सोलापुरात वाटण्यात आली आहेत. तर संघर्षाची मशाल हाती या पुस्तकाच्या २५ हजार प्रति छापण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेस माकपचे जिल्हा सचिव मंडळ सदस्य कुरमय्या म्हेत्रे, सिद्धप्पा कलशेट्टी, नसीमा शेख, प्रा.अब्राहम कुमार, सुनंदा बल्ला, ॲड.अनिल वासम आदी उपस्थित होते.

# राज्यासह जिल्ह्यात लंपी आजाराची साथ सुरूच

सुराज्य/सोलापूर

**राज्यासह सोलापूर जिल्ह्यामध्ये लंपी चर्म रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने जनावरे बाधित होऊन त्यांचा मृत्यू होत आहे. अद्यापही राज्यासह जिल्ह्यातही याची साथ सुरू आहे. या आजाराला रोखण्यासाठी सर्व ते प्रयत्न केले जात आहेत. जिल्ह्यामध्ये आतापर्यंत जनावरे ३८५२ झाले असून त्या बदल्यात शेतकऱ्यांना अनुदान देण्यात आले आहे.**

जिल्ह्यात आजपर्यंत ३८५२ जनावरांचा मृत्यू

सोलापूर जिल्ह्यामध्ये जातिवंत खिलार जनावरे चांगल्या प्रतीच्या संकरित गाई मोठ्या प्रमाणात असून विसाव्या पशुगणनेनुसार गाय वर्गाची संख्या ७४ लाख ५४ हजार ४०० इतकी आहे.शेळ्या ९६ लाख २५ हजार चार व मेंढ्या १२ लाख ५३ हजार ६८ इतके आहेत .त्यामुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात आहे. दुग्ध व्यवसाय ग्रामीण अर्थकारणाचा कणा आहे. त्यामुळे भविष्यात शेतकऱ्यांचे जनावराचे लंपी आजाराने नुकसान होऊ नये म्हणून पशुसंवर्धन खात्याच्या वतीने सर्वतोपरी उपाय योजले आहेत. सध्या सोलापूर जिल्ह्यामध्ये मंगळवेढा ,मोहोळ आणि सांगोला या तालुक्यात लंपि आजार काही प्रमाणात आढळून आलेला असून त्याकरिता पशुसंवर्धन खात्यातील कर्मचारी कामाला लागले आहेत. या आजाराला रोखण्यासाठी सर्व ते प्रयत्न केले जात आहेत .जिल्ह्यामध्ये आतापर्यंत मृत जनावरे ३८५२ झाले असून त्या बदल्यात शेतकऱ्यांना अनुदान देण्यात आले आहे.

पावसाळ्यामध्ये अनुभवणाऱ्या विविध साथ रोगापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने पशुधन मान्सूनपूर्व लसीकरण करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने पशुपालकांमध्ये जनजागृती होण्यासाठी पशुवैद्यकीय दवाखान्यांना पुरवठा झालेल्या लसीद्वारे प्रतिबंधात्मक मानसून पूर्व लसीकरण करण्याचे काम सुरू आहे. पशुवैद्यकीय संस्था स्तरांवर लस मात्रांचा पुरवठा करण्यात आलेला असून पशुपालकांनी नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थेची संपर्क करून आपल्या पशुधनास सदर लस मात्र टोचून घ्यावे असेही आवाहन पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



### शेतकऱ्यांनी विविध उपयायोजना कराव्यात: नरळे

सोलापूर जिल्ह्यामध्ये राज्याच्या मानाने आजार हा कमी प्रमाणात जरी असला तरी भविष्यात त्याची मोठ्या प्रमाणात लागण होऊ नये म्हणून औषध फवारणी औषधाचे वेळेत उपलब्ध करून देणे, गोमाश्या आदींचा प्रादुर्भाव कमी करून देणे तसेच गाईच्या ठिकाणचे जागेची फवारणी करणे वगैरे व्यवस्था संबंधित शेतकऱ्यांनी करावी असे आवाहन पशुसंवर्धन अधिकारी नागनाथ नरळे यांनी केली आहे.

## हॅण्डल लॉक तोडून दुचाकी पळवली

सुराज्य/सोलापूर

दुय्यम निबंधक कार्यालय जिल्हा परिषद येथे हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.डीवाय.९६८० ही अज्ञात चोरट्याने हॅण्डल लॉक तोडून चोरून नेली आहे. ही घटना २३ मे रोजी दुपारी एक ते दोन वाजण्याच्या दरम्यान घडली. माणिक कुंडलिक हाक्के (वय-५२, रा.मु.पो.वडजी, ता.दक्षिण सोलापूर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोसई माळी हे करीत आहेत.




# पालिकेकडून २० हजार मिळकतींचा सर्व्हे; तब्बल ८०० मिळकतींची नोंदच नाही

सुराज्य/सोलापूर

बऱ्याच वर्षापासून सोलापूर शहरात वाढीव मिळकतींच्या शोध घेण्याची मोहीम घेतली जात नव्हती. महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी मात्र १२५ पथके स्थापन करून त्यांच्यामार्फत घरोघरी जाऊन मिळकतींचा सर्वे सुरू केला आहे पहिल्या टप्प्यात वीस हजार मिळकतींचा सर्वे झाला असून यातून सुमारे ८०० मिळकतींची नोंदच महापालिकेकडे नसल्याची माहिती उघड झाले आहे.

महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त विद्या पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वतीने मिळकत कर विभागाअंतर्गत सोलापूर शहरातील सर्व मिळकतींचे सर्वंकष सर्वेक्षण १५ मे पासून सुरू करण्यात आले आहे.



नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करून या सर्वेक्षणाचे काम सुरू करण्यात आले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांना यापूर्वीच दोनदा प्रशिक्षण देण्यात आले. मिळकतदारांच्या घरोघरी जाऊन गुगल फॉर्म भरून सर्व माहिती संकलित करण्यात येत आहे. एकूण ११३ पथकांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे. प्रत्येक पथकास रोज साधारणता: ४० ते ५० मिळकती सर्वेक्षणाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. पंधरा दिवसात जवळपास २० हजार घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. यामध्ये जवळपास ८०० मिळकतींची नोंद महापालिकेकडे नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

सोलापूर शहरात शहर व हद्दवाढ भागात सुमारे दोन लाख ५० हजार मिळकती आहेत. संपूर्ण घरांचा सर्वे झाल्यानंतर महापालिकेकडे नोंद नसलेल्या मिळकतींचा आकडा मोठा असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. शिवाय अनेकांनी वाढीव बांधकामे केली आहे, याचीही नोंद महापालिकेकडे झालेली नाही.

### वाढीव उत्पन्न मिळण्याची शक्यता

सर्वंकष सर्वे जर अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे केला तर महापालिकेकडे नोंद नसलेल्या मिळकती सापडणार आहेत याशिवाय वाढीव बांधकामाची नोंदही महापालिकेत होणार आहे. यामुळे सोलापूर पालिका सुमारे कोट्यवधी रुपयांचे वाढीव उत्पन्न टॅक्सच्या माध्यमातून मिळण्याची शक्यता आहे.

## पहिल्या पत्नीचा छळ; पतीने केले दोन विवाह

**सोलापूर :** तुझ्या आईकडून पैसे आण असे म्हणत पहिल्या पत्नीला शारीरिक व मानसिक त्रास देऊन मारहाण करत दमदाटी केली. पती गणेश सुरवसे याने पत्नीच्या संमतीशिवाय कर्नाटकमधील होळी गावची बालाजी जाधव यांची मुलगी माहेश्वरी हिच्यासोबत व कुमठा नाका येथे राहणारी प्रियंका यांच्याशी देखील लग्न केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी सुवर्णा गणेश सुरवसे (वय-३३, रा.भूषण नगर, वांगी रोड) या पहिल्या पत्नीने सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती गणेश सुरवसे, सासू सुनिता सुरवसे,सासरे सर्जेराव सुरवसे (सर्व. रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास महिला पोलीस हेडकॉन्स्टेबल चव्हाण या करीत आहेत.